१०४ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• मुंबई, शुक्रवार ३ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-२८, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 28 Marathi - Daily - Mumbai, 3 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
युद्धा मुळे stock market घसरणार?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# इराणशी युद्ध सुरूच राहणार! डोनाल्ड ट्रम्पची घोषणा
# पुढील दोन आठवडे इराणवर तुफानी हल्ले केले जातील

## आम्ही कधी युद्ध सुरू केले नाही! स्वत:चा बचाव केला



### अमेरिकन नागरिकांना इराण राष्ट्राध्यक्षांचे खुले पत्र

■ तेहरान

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी राष्ट्र संबोधून भाषण केल्यानंतर इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेश्कियन यांनी अमेरिकन नागरिकांना उद्देशून एक खुले पत्र लिहिले आहे. त्यांनी पत्रात म्हटले आहे की, इराणला धोकादायक देश म्हणून दाखवले जाणे चुकीचे आहे. इराण हा जगातील प्राचीन संस्कृतींपैकी एक असून त्यांनी कधीही स्वतःहून युद्ध सुरू केले नाही. इराणने फक्त स्वतःवर हल्ला झाल्यावरच बचावात्मक कारवाई केली आहे. इराणच्या लोकांना अमेरिकन किंवा इतर देशांच्या लोकांबद्दल कोणताही द्वेष नाही. पण अमेरिकेच्या धोरणांमुळे, परकीय हस्तक्षेप आणि कडक निर्बंधांमुळे इराणमध्ये अविश्वास निर्माण झाला आहे.

मसूद पेजेश्कियन यांनी अमेरिकेवर आरोप केला की, इराणला धोका म्हणून दाखवणे हे राजकीय आणि आर्थिक कारणांसाठी केले जाते. तसेच इराणभोवती मोठ्या प्रमाणावर अमेरिकन सैन्य तैनात असल्यामुळे तणाव वाढत आहे. इराणने संवाद आणि कराराचा मार्ग स्वीकारला होता, पण अमेरिकेनेच त्यातून माघार घेतली. युद्ध आणि निर्बंधांमुळे सामान्य लोकांचे मोठे नुकसान होत आहे. इराण आणि अमेरिकेचे संबंध सुरुवातीला वैरपूर्ण नव्हते. मात्र, इराणच्या संसाधनांच्या राष्ट्रीयीकरणाला रोखण्यासाठी झालेल्या हस्तक्षेपाने परिस्थिती बदलली. त्या घटनेमुळे लोकशाही प्रक्रियेला धक्का बसला. हुकूमशाही पुन्हा प्रस्थापित झाली आणि अमेरिकेच्या धोरणांबद्दल इराणी जनतेत अविश्वास निर्माण झाला. » पान ७ वर



**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज भारतीय वेळेनुसार पहाटे सकाळी ६ वाजताच्या सुमारास देशाला संबोधून भाषण केले. यावेळी त्यांनी इराणविरुद्धचे युध्द सुरूच राहील हे स्पष्ट केले. त्यांच्या या वक्तव्याने आज सकाळी शेअर बाजार धडाधड कोसळला.**

■ वॉशिंग्टन

**पुढील** दोन आठवडे इराणवर जबरदस्त हल्ले केले जातील असे ट्रम्प यांनी जाहीर केले. आता तेल व नैसर्गिक वायू आपण व व्हेनेझुएला उत्पादन व वितरणात अव्वल असून आपल्याकडून तेल विकत घ्यावे असे आवाहन ट्रम्प यांनी केले. इराणला अणु सक्षम बनू देणार नाही याचा पुनरुच्चार करीत त्यांनी मित्रदेशांना होर्मुज सामुद्रधुनी काबीज करण्याचे आवाहन केले. डोनाल्ड ट्रम्प आपल्या अर्ध्या तासाच्या भाषणात म्हणाले की, 'एपिक फ्युरी' सुरू करून एक महिना झाला आहे. जगातील दहशतवादाला पोसणाऱ्या इराणच्या विरोधात हे आक्रमण होते. गेले चार आठवडे आपण अभूतपूर्व यश मिळविले आहे. त्यांचे नेते ठार झाले, त्यांचे लष्कर उद्ध्वस्त झाले, त्यांची क्षेपणास्त्रे डागण्याची क्षमता न्यूनतम स्तरावर आली आहे. त्यांच्या रॉकेट लॉन्चरचे आपण तुकडे करीत आहोत. गेल्या ५ वर्षात माझ्या नेतृत्त्वाखालील अमेरिकेचा सतत विजय होत आहे. व्हेनेझुएलाही आपण काही मिनिटांत काबीज केले. आपली लष्करी ताकद आता परमोच्च बिंदुला पोहोचली आहे. व्हेनेझुएलाशी आपण करार करून नैसर्गिक वायू आणि तेलाचे उत्पादन व विक्री फार मोठ्या प्रमाणात करीत आहोत. अमेरिकेनंतर सर्वाधिक साठा तिथे आहे. आता आपल्याला तेल व वायूसाठी कुणावर अवलंबून राहण्याची गरज नाही. इराणच्या तेलाची व वायूची आपल्याला आवश्यकता नाही. » पान ७ वर

## नासाचे आर्टेमिस-२ चंद्राकडे झेपावले
## पाच दशकांनंतरची ऐतिहासिक मोहीम



**अमेरिकेची अवकाश संशोधन संस्था नासाच्या ऐतिहासिक आर्टेमिस-२ मोहिमेअंतर्गत चार अंतराळवीरांना घेऊन ओरियन रॉकेट फ्लोरिडातील केनेडी स्पेस सेंटरवरून भारतीय वेळेनुसार आज पहाटे ३ वाजून ५४ मिनिटांनी चंद्राच्या दिशेने झेपावले. १९७२ च्या अपोलो १७ मोहिमेनंतर आर्टेमिस-२ मोहीमेच्या माध्यमातून सुमारे ५३ वर्षांनंतर अंतराळवीर पहिल्यांदाच पृथ्वीच्या कक्षेबाहेर चंद्राभोवती प्रवास करून परत येणार आहे. त्यामुळेच ही मोहीम ऐतिहासिक ठरली आहे.**

■ वॉशिंग्टन

**या मोहिमेसाठी** नासाने स्पेस लाँच सिस्टीम (एसएलएस) या तंत्रज्ञानाचा वापर केला आहे.एसएलएस रॉकेटचे केनेडी स्पेस सेंटरमधून प्रक्षेपण होताना रॉकेटचा आवाज काही किलोमीटर अंतरापर्यंत ऐकू आला.यावेळी हजारो लोक आणि नासाचे कर्मचारी हे प्रक्षेपण प्रत्यक्ष पाहण्यासाठी उपस्थित होते. प्रक्षेपण यशस्वी होताच सर्वांनी टाळ्यांच्या कडकडाटात मोहिमेला सदिच्छा दिल्या.

१९६० आणि १९७० च्या दशकात नासाने सहा अपोलो मोहिमांद्वारे १२ अंतराळवीरांना चंद्रावर उतरवले होते. त्यानंतरच्या काळात आजवर शेकडो अंतराळवीरांनी अंतराळ प्रवास केला. मात्र त्यांच्यापैकी कोणीही आंतरराष्ट्रीय अवकाश तळाच्या पुढे गेले नव्हते. हा अवकाश तळ पृथ्वीपासून सुमारे ४०० किलोमीटर अंतरावर पृथ्वीच्या निम्न कक्षेत (लोअर अर्थ ऑर्बिट) स्थापित आहे.पहिल्या चांद्रमोहिमेला अपोलो हे नाव ग्रीक देवावरून देण्यात आले होते.या ग्रीक देवाच्या जुळ्या बहिणीचे नाव आर्टेमिस (चंद्र) होते. त्यावरून या मोहिमेला आर्टेमिस हे नाव देण्यात आले आहे. ग्रीक पुराणकथेत या जुळ्या बहिणीचा » पान ७ वर

## थोडक्यात...

### शिवसेना पक्ष -चिन्ह सुनावणी २३ एप्रिलला

**नवी दिल्ली** - सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा शिवसेना पक्ष आणि चिन्हासंदर्भातील सुनावणी पुढे ढकलली आहे. ही सुनावणी आधी १ एप्रिलला होणार होती, मात्र आता ती २३ एप्रिलपर्यंत पुढे ढकलण्यात आली असल्याची माहिती उबाठाचे खासदार




संजय राऊत यांनी दिली. राऊत म्हणाले की, गेल्या चार वर्षांपासून तारखांवर तारखा दिल्या जात आहेत, शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या खटल्यांवर सुनावणी पूर्ण होत नाही. अंतिम सुनावणीसाठी वेळ मागितला जातो, पण अशा संवैधानिक पेचाच्या प्रसंगातही सर्वोच्च न्यायालय हे खटले गांभीर्याने घेत नाही, याबाबत प्रश्न उपस्थित होतो. कोणाचा दबाव आहे? शिवसेना पक्ष या संदर्भातला खटला चालवू नये, यासाठी दबाव आहे का हे सरन्यायाधीशांनी हिमतीने स्पष्ट करावे.

### पुणे जिल्ह्यात सलग चौथ्या दिवशी अवकाळी पाऊस

**पुणे** - पुणे जिल्ह्यात आज सलग चौथ्या दिवशी अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने लोकांची दाणादाण उडाली. आज दुपारनंतर अचानक हवामानात बदल झाला आणि वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. अवघ्या पंधरा-वीस मिनिटांच्या पावसाने पुणे शहरातील रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतूक मंदावली. कात्रज, स्वारगेट, पाषाण, धानोरी, शिवाजीनगर आदि भागात पावसाचे पाणी साचले, वाहतूक विस्कळीत झाली. पावसाने वातावरण आल्हाददायक झाले असले तरी जिल्ह्यात गेले तीन दिवस अवकाळी पाऊस सुरु असल्याने शेतकरी आधीच चिंताग्रस्त झाले होते .त्यात आजच्या पावसाने त्यांची चिंता वाढली आहे. पुणे शहर, उपनगरे आणि घाटमाथा असा सर्वदूर अवकाळी पाऊस झाल्याने काढणीला आलेली ज्वारी-बाजरीची पिके पाण्यात भिजल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले.

## मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या अध्यक्षपदी शरद पवार बिनविरोध

■ मुंबई

**शतकोत्तर** सुवर्ण महोत्सव साजरा केलेल्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांची बिनविरोध निवड झाली. यासोबतच सात उपाध्यक्ष आणि १५ कार्यकारिणी सदस्यही बिनविरोध निवडून आले.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

१५ मार्च रोजी संस्थेच्या ४० जागांसाठी निवडणूक पार पडली होती. त्यापैकी २८ सदस्य आधीच बिनविरोध निवडले गेले होते. उर्वरित कार्यकारिणी निवडीची प्रक्रिया ३ एप्रिल रोजी होणार होती. मात्र अर्ज भरण्याच्या अंतिम दिवशी अध्यक्षपदासाठी शरद पवार यांच्याशिवाय अन्य कोणताही अर्ज न आल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली.

उपाध्यक्ष पदांच्या ७ जागा आणि कार्यकारिणी सदस्यांच्या १५ जागांसाठी तेवढेच अर्ज आल्याने सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले. या निवडणुकीसाठी किरण सोनावणे यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. शरद पवार हे गेली तीन दशके मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या अध्यक्षपदी कार्यरत आहेत.

## भोंदू खरातचे चाकणकरांच्या बहिणीसह अनेकांचे आधार व पॅन घेऊन व्यवहार

■ नाशिक

**नाशिकच्या** सिन्नर भागात भोंदू बाबा अशोक खरातने शेकडो महिलांची फसवणूक करून अत्याचार केल्याच्या प्रकरणाने राज्यात खळबळ उडाली आहे. त्याचबरोबर त्याने अनेकांचे आधार आणि पॅन कार्ड घेऊन जगदंब आणि समता पतसंस्थांच्या माध्यमातून कोटींचे व्यवहार केल्याची माहिती आहे. यामध्ये अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली चाकणकर यांच्या बहिणीच्या खात्याचा समावेश आहे.

**८ एप्रिलपर्यंत पुन्हा पोलीस कोठडी**



याशिवाय,आज अशोक खरातला ४ दिवसांच्या पोलीस कोठडीनंतर ऑनलाईन पद्धतीने न्यायालयात हजर केले होते. या सुनावणीत सरकारी पक्षाने खरात हा 'मास्टरमाईंड' असून तो तपासात सहकार्य करत नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने खरातला ८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. खरातने कांदा खरेदीत नाफेडला हजारो कोटींचा गंडा घातल्याचाही आरोप झाला आहे. याशिवाय पोलिसांनी खरातची पत्नी कल्पना खरातच्या नावाने लुकआऊट नोटीस जारी केली आहे. » पान ५ वर

## ५ राज्यांत पावसाचा इशारा गारपिटीने पिकांचे नुकसान

■ लखनौ

**देशभरातील** हवामानात पुन्हा एकदा मोठा बदल होत असून पुढील काही दिवसांत पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यांचा प्रभाव वाढण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशसह किमान पाच राज्यांमध्ये पावसाचा इशारा देऊन शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

मध्य प्रदेशातील सुमारे ३० जिल्ह्यांमध्ये तर उत्तर प्रदेशातील ४० जिल्ह्यांमध्ये पावसाचा अंदाज आहे. गेल्या काही दिवसांपासून या राज्यांमध्ये ढगाळ वातावरण, वादळी वारे आणि अधूनमधून पावसाच्या सरी कोसळत आहेत. लखनौ, अमेठीसह अनेक शहरांमध्ये पावसाची नोंद झाली. कन्नौजमध्ये सर्वाधिक २९ मिमी पावसाची नोंद झाली तर काही भागात तापमानात चढ-उतार जाणवत आहे.

हरियाणामध्ये पाऊस आणि गारपीट यामुळे शेतीला मोठा फटका बसला. राज्यातील सात जिल्ह्यांमधील सुमारे १०० गावांमध्ये गहू, मोहरी आणि हरभऱ्याच्या उभ्या पिकांचे नुकसान झाले. उत्तराखंडमध्ये रुद्रप्रयाग जिल्ह्यातील सोनप्रयाग परिसरात गारपीट झाली.

## केदारनाथसाठी हेलिकॉप्टर सेवा २१ एप्रिलपासून सुरू

■ डेहराडून

**यंदाच्या** चारधाम यात्रेसाठी केदारनाथ धामचे दरवाजे २२ एप्रिलपासून खुले होतील. तर २१ एप्रिलपासून हेलिकॉप्टर सेवा सुरू होणार आहे. यासाठी उत्तराखंड नागरी उड्डाण विकास प्राधिकरणाने भाडे दर निश्चित केले आहेत. हेलिकॉप्टर सेवा गुप्तकाशी ते केदारनाथ, फाटा ते केदारनाथ आणि सिरसी ते केदारनाथ अशी असेल. १९ एप्रिल रोजी यमुनोत्री आणि गंगोत्रीची कपाटे खुली होऊन चारधाम यात्रेला प्रारंभ होईल. केदारनाथ धामसाठी हेलिकॉप्टर सेवेचा वापर जास्त प्रमाणात होतो. गुप्तकाशी,फाटा आणि सिरसी येथून हेलिकॉप्टर सेवा चालवली जाते, त्यासाठी यंदा नवीन निविदा काढण्यात आल्या आहेत.निविदा प्रक्रियेत अनेक कंपन्यांनी सहभाग घेतला,त्यातील आठ कंपन्यांची निवड झाली आहे.गेल्या वर्षीच्या तुलनेत सिरसी आणि गुप्तकाशी येथून प्रवासाचे हेलिकॉप्टरचे भाडे कमी करण्यात आले आहे. तर फाटा येथील भाडे वाढवण्यात आले आहे.गेल्या वर्षी फाटा येथून केदारनाथला येण्या-जाण्याचे भाडे ८८४२ रुपये होते. ते ८३८ रुपयांनी वाढवण्यात आले आहे.

## पेट्रोलियम उत्पादनांवरील आयात शुल्क माफ खते आणि रसायन उद्योगाला मोठा दिलासा

■ नवी दिल्ली

**मध्यपूर्वेतील** युद्धस्थिती अधिकच चिघळण्याची स्पष्ट चिन्हे दिसल्याने केंद्र सरकारने आज एक मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने २ एप्रिल ते ३० जून या कालावधीसाठी सर्व पेट्रोलियम उत्पादनांवरील आयात शुल्क पूर्णपणे माफ केले आहे.खते आणि रसायन उद्योगाला हा मोठाच दिलासा मानला जात आहे.

मध्यपूर्वेत गेला महिनाभर सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली त्यामुळे भारतासह अनेक देशांवर गंभीर ऊर्जा संकट ओढवले. विविध कच्च्या मालाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार अमोनियम नायट्रेटसह सुमारे चाळीस प्रकारच्या पेट्रोलियम उत्पादनांवरील आयात शुल्क माफ केले आहे.यामध्ये मिथेनॉल, फिनॅल, पीव्हीसी, पॉलिप्रोपॅलीन यांसारख्या महत्त्वाच्या रसायनांचा समावेश आहे. उद्योगांवरील खर्चाचा ताण कमी करण्याच्या उद्देशाने सरकारने हा निर्णय घेतला.

या निर्णयामुळे रासायनिक खतांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना सर्वाधिक लाभ होणार आहे. अमोनियम नायट्रेट हे खत निर्मितीसाठी लागणारे अत्यंत महत्त्वाचे रसायन आहे. सरकारने अमोनियम नायट्रेटवरील कृषी पायाभूत सुविधा कर आणि विकास उपकरही रद्द केला आहे. याचा खत उद्योगाला अतिरिक्त आर्थिक फायदा होणार आहे. पेट्रोलियम आणि प्लास्टिकच्या कच्च्या मालावरील शुल्क हटवल्यामुळे पॅकेजिंगत् वाहन निर्मिती, इलेक्ट्रॉनिक्स आणि ग्राहकोपयोगी वस्तु उत्पादन क्षेत्रालाही मोठा फायदा होणार आहे.तसेच पीव्हीसी पाईप, पेंट, कोटिंग, इन्शुलेशनसाठी लागणारे साहित्य, वाहनांचे प्लास्टिकचे सुटे भाग, सीट फोम तयार करण्यासाठीही रसायनांचा वापर होतो.

## राजेश खन्ना - अनिता अडवाणी यांच्यात वैवाहिक नातेसंबंध नाही
### हायकोर्टाने अडवाणी यांची याचिका फेटाळली

**बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार अशी ओळख असलेल्या दिवंगत अभिनेते राजेश खन्ना यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबियांना हायकोर्टाने मोठा दिलासा दिला आहे. राजेश खन्ना यांच्यासोबत असलेल्या आपल्या संबंधांना 'विवाह' म्हणून मान्यता देण्याची मागणी करत अभिनेत्री अनिता अडवाणी यांनी दाखल केलेली याचिका न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या एकलपीठाने फेटाळून लावत याप्रकरणी दिंडोशी सत्र न्यायालयाने दिलेल्या निकालावर शिक्कामोर्तब केले.**



■ मुंबई

**दिवंगत** सुपरस्टार अभिनेते राजेश खन्ना यांच्या निधनानंतर अडवाणी यांनी आपले आणि राजेश खन्ना यांच्याशी संबंध असल्याचा दावा करून कपाडिया, अक्षय कुमार आणि ट्विंकल खन्ना यांच्या विरोधात कौटुंबिक हिंसाचाराचा आरोप करणारी फौजदारी तक्रार दाखल केली » पान ७ वर

## आता मुंबईत जैन प्रीमियर लीग १२ संघांना ३१ कोटी रुपये

■ अहमदाबाद

**क्रिकेट** आयपीएल गाजत असतानाच आता मुंबईत एप्रिल मे महिन्यात जैन समुदायाची जैन प्रीमियर लीग ( जेपीएल ) खेळवली जाणार आहे. यासाठीच्या पहिल्या फ्रँचायझी लिलावात १२ संघांची एकूण ३१ कोटी रुपयांना विक्री झाली आहे. यावेळी ५० हून अधिक बोलीदारांनी सहभाग घेतला होता. या आकड्यांमुळे ही लीग मुख्य प्रवाहातील स्पर्धांनाही टक्कर देणारी ठरणार हे उघड आहे. एप्रिल-मे महिन्यांत १२ शहरांमध्ये ४० पेक्षा अधिक सामने खेळवण्याची योजना असून प्लेऑफ आणि अंतिम सामना मुंबईत होण्याची शक्यता आहे.

जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या क्रीडा विभागाने आयोजित केलेल्या लिलावात आयपीएलप्रमाणे स्पर्धात्मक वातावरण पाहायला मिळाले. मुंबई सोबो स्टार हा संघ ३.७ कोटी रुपयांना विकला जाऊन सर्वात महाग फ्रँचायझी ठरला, तर बेंगळुरू संघ ३.१५ » पान ७ वर

श्री स्वामी समर्थ
ऐकू कमी येणाऱ्यांसाठी
कानाचे मशिन रु. २९९९/- ते रु. १३९९९/- पर्यंत
आतील न दिसणारे लहान मशिन रु. ६९९९/- मध्ये उपलब्ध

कानाची ऑडिओमेट्री तपासणी करुन मिळेल मशिन मिळेल. तसेच डिजिटल, प्रोग्रॅमिंग, कॉम्प्युटराईज्ड कानाचे माप घेऊन ही मशिन उपलब्ध. किंमत रु. १८९९९/- पासुन उपलब्ध. रिचार्जेबल मशिन मुळ किंमतीवर ५०% पर्यंत सवलत.
खास ऑफर - दि. 3 एप्रिल ते 6 एप्रिल पर्यंत
दादर (प.) वनमाली हॉल मध्ये,१ ला मजला, छबीलदास हायस्कूल समोर, आयडीयल बुक स्टॉल शेजारी, स्टेशन जवळ
भेटण्याची वेळ : सकाळी ९ ते सायं. ७ पर्यंत. संपर्क मो. 9359243308

## मुलाच्या बाराव्याच्या दिवशीच सून म्हणाली- घर खाली करा! म्हातारा बाप शांतपणे निघून गेला... पण दुसऱ्या दिवशी सूनबाईंच्या ऑफिसमध्ये जाऊन बापाने जो 'बॉम्ब' टाकला, त्याने सुनेचा श्वासच कोंडला.!

# ओझे : तरुण पिढीच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी कथा...



- शीतल कुलकर्णी

**नाशिकच्या** इंदिरा नगर परिसरातील एका सुंदर फ्लॅटमध्ये ६५ वर्षांचे 'माधवराव' आपला मुलगा समीर आणि सून 'नेहा' यांच्यासोबत राहत होते. माधवराव एका सरकारी कचेरीतून हेड क्लर्क म्हणून निवृत्त झाले होते. समीर एका खाजगी कंपनीत इंजिनिअर होता, तर सून 'नेहा' नाशिकच्याच एका मोठ्या फायनान्स कंपनीत 'ब्रांच मॅनेजर' (Branch Manager) होती. नेहाला तिच्या पदाचा आणि पैशांचा प्रचंड गर्व होता.

सगळं काही सुरळीत चालू असताना, एके दिवशी अचानक काळ कोसळला. ऑफिसमधून येताना समीरला गाडीवरच भयंकर हार्ट अटॅक आला आणि वयाच्या अवघ्या ३२ व्या वर्षी समीर हे जग सोडून गेला!

माधवरावांच्या आयुष्याची दोरीच तुटली. म्हातारपणी पोटच्या पोराची तिरडी उचलण्यासारखं दुसरं कोणतंही मोठं दुःख या जगात नाही. घर पूर्णपणे शांत झालं होतं.

तो निष्ठुर प्रसंग आणि सुनेचा खरा चेहरा:

समीरच्या निधनाला १२ दिवस उलटले. 'तेरावीचा' विधी आटोपला, आलेले पाहुणे आणि नातेवाईक आपापल्या घरी निघून गेले. रात्री माधवराव समीरच्या फोटोसमोर शून्यात नजर लावून बसले होते. त्यांच्या डोळ्यांतले अश्रू अजूनही थांबले नव्हते.

तेवढ्यात सूनबाई (नेहा) त्यांच्या खोलीत आली. तिच्या चेहऱ्यावर दुःखापेक्षा एक विचित्र कठोरपणा होता. तिने माधवरावांसमोर उभे राहून थेट विषय काढला-

बघा बाबा, जे व्हायचं ते झालं. आता समीर या जगात नाही. मला माझं पुढचं आयुष्य बघायचंय. समीरने हा ५० लाखांचा फ्लॅट घेतला होता, आता तो माझा आहे. तुमचा आजारपणाचा आणि जेवणाचा खर्च मी एकटी उचलू शकत नाही. त्यामुळे उद्याच्या उद्या २४ तासांच्या आत तुम्ही तुमचं सामान बांधा आणि हे घर खाली करा! तुम्ही गावी जा किंवा वृद्धाश्रमात जा, पण मला या घरात आता कुणीही नकोय!

पोटच्या पोराच्या 'तेरावीच्याच' दिवशी एका बापाला घरातून हाकलून दिलं जात होतं! माधवरावांच्या काळजाचे हजार तुकडे झाले. पण ते काहीच बोलले नाहीत. त्यांनी कोणताही वाद घातला नाही की ते रडले नाहीत. माधवराव फक्त अत्यंत शांतपणे आणि मूकपणे हसले.

त्यांनी त्याच रात्री एका जुन्या पिशवीत आपले २-४ कपडे भरले, समीरच्या फोटोला शेवटचा नमस्कार केला आणि रात्री ११ वाजताच ते ते घर सोडून निघून गेले! नेहाला वाटलं, म्हातारा घाबरला आणि कटकट कायमची संपली. तो सत्याचा स्फोट आणि पायाखालची जमीन सरकवणारा प्रसंग: दुसऱ्या दिवशी दुपारची वेळ होती. नेहा आपल्या फायनान्स कंपनीच्या ऑफिसमध्ये केबिनमध्ये बसून काम करत होती. अचानक तिच्या केबिनचा दरवाजा उघडला गेला.

नेहाने समोर पाहिलं आणि ती अवाक् झाली! समोर तिचे सासरे, माधवराव उभे होते आणि त्यांच्यासोबत एक काळा कोट घातलेला 'वकील' होता. नेहा रागाने खुर्चीवरून उठली आणि ओरडली, तुम्ही इथे काय करताय? मी कालच सांगितलं होतं ना मला तुमचा चेहरा बघायचा नाहीये. सिक्युरिटीला बोलावू का?

माधवराव अत्यंत शांत होते. त्यांच्या चेहऱ्यावर कालची ती हतबलता नव्हती. वकिलाने पुढे होऊन एक 'फाईल' आणि 'कायदेशीर नोटीस' (Legal Notice) नेहाच्या टेबलवर आपटली!

माधवराव अत्यंत करारी आवाजात म्हणाले, सिक्युरिटीला मी नाही, आता तू बोलवणार आहेस नेहा! काल तू मला ज्या घरातून 'माझं घर आहे' म्हणून हाकलून दिलंस ना... त्या घराचे हे ओरिजिनल 'रजिस्ट्रीचे कागद' (Property Documents) आहेत. जरा उघडून बघ ते!

नेहाने थरथरत्या हाताने ती फाईल उघडली. आणि पहिलंच पान वाचताच तिच्या पायाखालची जमीनच सरकली! तिचा श्वास अक्षरशः कोंडला गेला!

त्या ५० लाखांच्या फ्लॅटच्या कागदपत्रांवर समीरचे नाही, तर 'माधवराव जोशी' हे नाव स्पष्ट अक्षरात लिहिले होते!

माधवराव पुढे म्हणाले, समीरचा पगार कमी होता, त्याला बँक लोन देत नव्हती. म्हणून मी माझ्या आयुष्यभराची 'पेन्शन' आणि 'पीएफचे' (PF) ४० लाख रुपये टाकून हे घर 'माझ्या' नावावर रोखीने विकत घेतलं होतं! फक्त समाजासमोर आणि नातेवाईकांसमोर माझ्या समीरची कॉलर टाईट राहावी, त्याला कमीपणा वाटू नये, म्हणून मी दारावर 'समीर निवास' अशी पाटी लावली होती... आणि तुला वाटलं की ते घर समीरचं आहे!

अहंकाराचा चक्काचूर आणि वकिलाचा दणका:

नेहाचा चेहरा पांढराफटक पडला होता. तिला घाम फुटला होता.

वकील कडक आवाजात म्हणाला, मॅडम, माधवरावांनी कालच तुमच्या नावाने १५ दिवसांची 'Eviction Notice' (घर खाली करण्याची नोटीस) काढली आहे. ज्या बापाने पोटच्या पोराच्या बाराव्याच्या दिवशीच त्याला गमावल्याचं दुःख बाजूला ठेवून, सुनेच्या मायेपोटी घरात राहायचा निर्णय घेतला होता... त्या बापाला तुम्ही रस्त्यावर फेकलं! आता कायद्यानुसार ते घर १००% माधवरावांचे आहे. जर येत्या १५ दिवसांत तुम्ही ते घर खाली करून चाव्या दिल्या नाहीत, तर पोलीस स्वतः येऊन तुमचं सामान रस्त्यावर फेकतील!

ज्या ऑफिसमध्ये नेहा स्वतःला 'मॅनेजर' समजून रुबाबात राहायची, त्याच ऑफिसच्या स्टाफसमोर आज तिची अब्रू वेशीवर टांगली गेली होती! तिचा 'प्रॉपर्टीचा' माज एका झटक्यात मातीत मिळाला होता.

नेहा वेड्यासारखी रडत माधवरावांच्या पायांवर कोसळली! बाबा... मला माफ करा बाबा! माझ्याकडून भयंकर चूक झाली. मी प्रॉपर्टीच्या आहारी गेले होते. मला घराबाहेर काढू नका...

पण माधवरावांनी आपले पाय मागे घेतले. ते डोळे पुसत म्हणाले,

तू काल माझी सून राहिली नाहीस नेहा... काल तू फक्त एक 'स्वार्थी मालकीण' होतीस! पोराच्या दुःखात जेव्हा मला तुझ्या आधाराची गरज होती, तेव्हा तू मला लाथ मारलीस. आता या अश्रूंची काहीच किंमत नाही. घर खाली कर... कारण आता हा बाप कुणासमोरही झुकणार नाही! असं म्हणत माधवराव ताठ मानेने त्या ऑफिसमधून बाहेर पडले! नेहाकडे आता ना नवरा होता, ना राहायला हक्काचं घर होतं... पैशाच्या अहंकाराने तिचं पूर्ण आयुष्य एका दिवसात उद्ध्वस्त केलं होतं!

स्वतः काहीच न कमवता, म्हाताऱ्या सासू-सासऱ्यांच्या प्रॉपर्टीवर डोळा ठेवून त्यांना 'ओझं' समजणाऱ्या आजच्या पिढीच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी ही कथा.

# रेल्वेची डिजिटल परतावा मोहीम २५१ प्रकरणे निकाली काढली



■ मुंबई

**पश्चिम** रेल्वेने मुंबई उपनगरीय विभागात स्मार्ट असिस्टंट अॅण्ड रिफंड अर्थात 'सरल' डिजिटल रिफंड मोहीम सुरू केली आहे. याद्वारे तिकीट बुकिंग करताना पैसे कापूनही तिकीट न मिळाल्यास, क्यूआर कोड स्कॅन करून प्रवासी सहजपणे रिफंडचा दावा करू शकतात. त्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचेल आणि तक्रार निवारण जलद होईल. गेल्या १० अशा प्रकारच्या ३७० तक्रारींची नोंद झाली असून त्यातील २५१ प्रकरणे निकाली काढली आहेत.

### 'क्यूआर कोड' मुळे घरबसल्या परतावा

उर्वरित ११९ प्रकरणांची प्रक्रिया सुरू आहे. या मोहिमेंतर्गत सर्वांत जास्त तक्रारी उपनगरीय लोकल प्रवाशांकडून आल्या होत्या.केवळ दोन दिवसांत यातील अनेक प्रकरणे निकाली काढली आहेत. 'रेल वन', 'यूटीएस' आणि 'आयआरसीटीसी' सारख्या प्लॅटफॉर्मवर डिजिटल तिकीट बुक करताना अनेकदा प्रवाशांच्या खात्यातून पैसे कापले जातात, परंतु तिकीट मिळत नाही. पूर्वी अशा प्रकरणांमध्ये परतावा मिळवण्यासाठी वारंवार पाठपुरावा करावा लागायचा. त्यासाठी रेल्वेच्या कार्यालयातही चकरा माराव्या लागत होत्या.

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात आता 'रायबा'चे आगमन

■ राधानगरी

**पश्चिम** महाराष्ट्रातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात आणखी एका नव्या वाघाचे आगमन झाले आहे.या नर वाघाचे नामकरण 'रायबा' असे करण्यात आले आहे. राधानगरी अभयारण्यात काही महिन्यांपासून या वाघाचा वावर असल्याचे बोलले जात होते.

या वाघाचे छायाचित्र वन विभागाने लावलेल्या ट्रॅप कॅमेऱ्यात कैद झाले आहे. यावरून या वाघाची नोंद करण्यात आली आहे.तीन ते चार वर्षे वयाचा हा सुदृढ वाघ यापूर्वी वन विभागाच्या रेकॉर्डवर नव्हता.डिसेंबर २०२५ मध्ये प्रथमच ट्रॅप कॅमेऱ्यातून त्याचे स्पष्ट छायाचित्र टिपण्यात आले.

# भंगार विक्रीतून मध्य रेल्वेला ४६० कोटींचा महसूल

■ मुंबई

**मध्य** रेल्वेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात भंगार विक्रीतून तब्बल ४५९.५२ कोटी रुपयांचा महसूल मिळवत मोठी कमाई केली आहे. रेल्वे बोर्डाने निश्चित केलेले ४५० कोटींचे लक्ष्य पूर्ण करत मध्य रेल्वेने गेल्या दोन वर्षांतील विक्रमी कमाई नोंदवली आहे.

या उपक्रमांतर्गत रेल्वेच्या विविध कार्यशाळा, यार्ड आणि विभागांमध्ये साठून राहिलेले अनुपयोगी साहित्य शोधून त्याची विल्हेवाट लावण्यावर विशेष भर देण्यात आला. या मोहिमेत कुर्ला कटिंग यार्ड, ट्रॅक्शन मशीन वर्कशॉप, परळ वर्कशॉप आणि मनमाड वर्कशॉप यांसह सर्व पाच विभागांमध्ये व्यापक मोहीम राबवण्यात आली. रेल्वे प्रशासनाच्या या उपक्रमामुळे केवळ महसूल वाढला नाही, तर जागेचा योग्य वापर आणि व्यवस्थापनातही सुधारणा झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# कोल्हापूरचे तीन तालुके 'शक्तिपीठ' मधून वगळले

■ कोल्हापूर

**राज्यातील** तीर्थक्षेत्रे जोडणाऱ्या शक्तिपीठ महामार्गातून कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ, हातकणंगले आणि कागल हे तीन तालुके वगळले जाणार आहेत. आता हा महामार्ग सातारा जिल्ह्यातून जाणार आहे. यासंदर्भातील सुधारित नव्या रेखांकनाला राज्य शासनाने काल नुकतीच मान्यता दिली.

### नव्या रेखांकनाला राज्य शासनाची मान्यता

या नव्या रेखांकनानुसार, 'शक्तिपीठ' आता पन्हाळा, करवीर आणि चंदगड तालुक्यांतूनही जाणार आहे. मात्र, गावनिहाय अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतरच जिल्ह्यातून जाणारा हा महामार्ग नेमका कोणत्या गावांतून आणि कसा जाणार आहे, हे स्पष्ट होणार आहे. राज्य शासनाने नागपूर -गोवा शीघ्र संचार द्रुतगती महामार्गाच्या रेखांकनाला ७ एप्रिल २०२४ रोजी मान्यता दिली होती. मात्र, या प्रस्तावित महामार्गाला कोल्हापूर जिल्ह्यात मोठा विरोध झाला. यानंतर कोल्हापूर जिल्ह्यातील भूसंपादनाची अधिसूचना १५ ऑक्टोबर २०२४ रोजी रद्द केली. यानंतर २८ ऑगस्ट २०२५ रोजी पवनार ते सांगली अशी आखणी कायम ठेवण्यास मान्यता देण्यात आली. त्यानंतर उर्वरित आखणीचे उपलब्ध सर्व पर्याय व संभाव्य पर्यायांबाबत राज्य रस्ते विकास महामंडळाला अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. रस्ते विकास महामंडळाने संबंधित लोकप्रतिनिधींशी चर्चा करून,प्रत्यक्ष स्थळ पाहणीनुसार विविध पर्यायी आखणींचा अभ्यास करून सुधारित आखणी अंतिम केली. त्यानुसार वर्धा, यवतमाळ,बीड व लातूर या जिल्ह्यांतील आखणी कायम ठेवून अन्य जिल्ह्यांतील मूळ मंजूर आखणीत सुधारणा केली.

# उरुळी कांचनमध्ये दहावीच्या विद्यार्थिनीचे शाळेतून अपहरण

■ उरुळी कांचन

**दहावीच्या** परीक्षेचा शेवटचा पेपर देण्यासाठी शाळेत गेलेल्या १६ वर्षीय विद्यार्थिनीचे अपहरण झाल्याची धक्कादायक घटना उरुळी कांचन येथे घडली आहे. या प्रकरणी मुलीच्या वडिलांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित विद्यार्थिनी उरुळी कांचन येथील एका विद्यालयात दहावीच्या वर्गात शिकत होती. सकाळी सुमारे साडेनऊच्या सुमारास वडिलांनी तिला महात्मा गांधी विद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर दुचाकीवरून सोडले. गेटवर सोडून वडील घरी परतले. दुपारी साडेबारा वाजता एका शिक्षकाने फोन करून विद्यार्थिनी परीक्षेला उपस्थित नसल्याची माहिती दिली.

# पश्चिम बंगालमध्ये ७ निवडणूक निरीक्षकांना ओलीस ठेवले ! सर्वोच्च न्यायालय संतप्त

### संबंधितांकडून निष्क्रियतेबद्दल स्पष्टीकरण मागितले

■ कोलकाता

**सर्वोच्च** न्यायालयाने आज पश्चिम बंगालमधील मालदा जिल्ह्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीशी (एसआयआर) संबंधित ७ निवडणूक निरीक्षकांना ओलीस ठेवल्याच्या घटनेवर नाराजी व्यक्त केली. ही घटना पूर्वनियोजित आणि चिथावणीखोर वाटते. याचा उद्देश न्यायिक अधिकाऱ्यांचे मनोधैर्य खच्ची करणे आणि सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेत अडथळा निर्माण करणे हा आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

मुख्य न्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम पंचोली यांच्या खंडपीठाने म्हटले की, राज्यात कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. खंडपीठाने राज्याच्या गृह सचिवांना, डीजीपींना आणि इतर अधिकाऱ्यांना त्यांच्या निष्क्रियतेबद्दल स्पष्टीकरण मागितले. १ एप्रिल रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास ७ न्यायिक अधिकारी निवडणूक निरीक्षक म्हणून मालदा येथील माताबारी येथील बीडीओ कार्यालयात पोहोचले. हे सर्व अधिकारी एसआयआर प्रक्रियेशी संबंधित काम पाहत होते. संध्याकाळी ६:०० वाजता मतदार यादीतून नावे वगळल्याबद्दल हजारो आंदोलक बाहेर जमा झाले. त्यांनी मतदार यादीतून नाव वगळल्याबद्दल निदर्शने केली.

# कंत्राटदारांना गुडघ्यावर आणले? पेडणेकरांची महापालिकेवर टीका



■ मुंबई

**मुंबईतील** मिठी नदीतील गाळ सफाई कामाच्या पाहणीनंतर मुंबई महापालिकेच्या विरोधी पक्ष नेत्या किशोरी पेडणेकर यांनी प्रशासनावर जोरदार टीका करत कंत्राटदारांवर सवलती देत कामकाज चालवल्याचा आरोप केला. कंत्राटदारांना गुडघ्यावर आणण्याची भाषा करणाऱ्यांनी त्याच कंत्राटदारांना दोन-दोन कंत्राटे देऊन गुडघ्यावर आणले, अशी उपरोधिक टीका पेडणेकर यांनी केली.

किशोरी पेडणेकर म्हणाल्या की, गाळ सफाईसाठी तीन कंत्राटदार नेमले असले तरी प्रत्यक्षात एका कंत्राटदारालाच दोन कंत्राटे देण्यात आली आहेत. त्यामुळे केवळ दोनच कंत्राटदार काम करत असल्याचे चित्र आहे. काम उशिरा सुरू झाल्याने निर्माण झालेला १२ दिवसांचा खंड कसा भरून काढणार ? गाळ सुकण्यासाठी किमान ४८ तासांचा कालावधी लागतो, त्यात अवकाळी पावसामुळे कामात आणखी अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. कंत्राटदारांनी काम वेळेत पूर्ण केले नाही, तर आम्ही गप्प बसणार नाही.

# मुस्लीम आरक्षण रद्द! मुंबई हायकोर्टाचे सरकारला भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश

### सुनावणी ४ मे रोजी होणार

■ मुंबई

**सरकारी** नोकऱ्या आणि शिक्षणात मुस्लिमांना दिलेले पाच टक्के आरक्षण रद्द करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेची उच्च न्यायालयाने दखल घेतली. न्यायमूर्ती रियाज छागला आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने राज्य सरकार तीन भूमिका स्पष्ट करणारे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश देत, याचिकेची सुनावणी ४ मे रोजी निश्चित केली.

राज्य सरकारच्या नव्या शासन निर्णयानुसार विशेष मागासवर्गीय श्रेणी (अ) अंतर्गत समाविष्ट असलेल्या सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास मुस्लीम गटासाठी सरकारी, निमसरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये ५ टक्के आरक्षण देण्याशी संबंधित मागील सर्व निर्णय आणि अध्यादेश रद्द केले. तसेच २०१४ पासूनचे पूर्वीचे निर्णय आणि परिपत्रके रद्द करून विशेष मागासवर्गीय श्रेणीतील मुस्लिमांना जात आणि नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्रे देणे बंद केले. याला आक्षेप घेत अॅड. सय्यद एजाज अब्बास नक्वी यांनी अॅड. नितीन सातपुते यांच्यामार्फत याचिका दाखल केली. राज्य सरकारचा हा निर्णय संविधानाचे उल्लंघन करणारा आणि मुस्लीम समुदायाच्या हिताच्या विरोधात असल्याचा दावाही याचिकेत केला आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती रियाज छागला आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी सुनावणी झाली.

# 'आप'ने राघव चड्डा यांना उपनेतेपदावरून हटवले

■ नवी दिल्ली

**आम** आदमी पक्षाने त्यांचे वरिष्ठ नेते आणि राज्यसभा खासदार राघव चड्डा यांच्यावर कठोर कारवाई केली आहे. त्यांना राज्यसभेतील उपनेते पदावरून हटवण्यात आले आहे. तसेच त्यांना सभागृहात बोलण्यावर तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे.राघव चड्डा यांना हा मोठा धक्का मानला जात आहे. त्यांच्या जागी आता 'आप'चे खासदार अशोक मित्तल यांची राज्यसभेतील उपनेते म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भात पक्षाने राज्यसभा सचिवालयाला पत्र दिले आहे. पक्षाने सचिवालयाला असेही कळवले आहे की राघव चड्डा यांना संसदेत बोलण्यासाठी वेळ देऊ नये. ही कारवाई अशा वेळी झाली आहे, जेव्हा ते राज्यसभेत जनहिताचे मुद्दे सातत्याने मांडत होते.

# सोलापुरात शिवपुतळ्यावरून मराठा-धनगर समाजात वाद

■ सोलापूर

**सोलापूर** जिल्ह्यातील माढा तालुक्यातील अंजनगाव खेलोबा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावरून मराठा-धनगर या दोन गटांमध्ये वाद झाला. या वादातून दगडफेक, लाठीचार्ज आणि प्रशासकीय वाहनांची तोडफोड झाल्याने गावात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. प्रशासनाने जमावबंदी लागू करून दोन्ही समाजांमध्ये समन्वय साधण्यासाठी कॉर्नर सभा घेतली. यावेळी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी धनगर समाजाशी रस्त्यावर बसून चर्चा केली.

अंजनगाव खेलोबा येथे रात्रीच्या वेळी शिवप्रेमींनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला. मात्र, हा पुतळा खेलोबा देवस्थानाच्या परिसरात परवानगीशिवाय उभारल्याचा आक्षेप धनगर समाजाने घेतला. यामुळे मराठा आणि धनगर समाज आमनेसामने आल्याने वादाला तोंड फुटले.

वाद वाढल्याने रात्री उशिरा पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पुतळा हटवण्याचा प्रयत्न केला. यासाठी क्रेनही मागवली होती. मात्र, पुतळा हटवण्यास शिवप्रेमींनी विरोध केला. याच दरम्यान संतप्त जमावाकडून पोलिसांवर दगडफेक झाली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला.

या गोंधळात माढा तहसीलदारांच्या वाहनावरही जमावाने दगडफेक केली. या दगडफेकीत वाहनाचे मोठे नुकसान झाले. काही युवक जखमी झाल्याची माहिती असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# बहिणीची छेड काढणाऱ्या तिघांवर भावाकडून गोळीबार! एकाचा मृत्यू

■ ठाणे

**ठाण्यातील** मुंब्रा परिसरात भरदिवसा झालेल्या गोळीबाराच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. बहिणीची छेड काढल्याच्या रागातून भावाने तिघांवर गोळीबार केला. या घटनेत एका तरुणाचा मृत्यू झाला असून दोघे गंभीर जखमी झाले आहेत.

ही घटना मुंब्र्यातील सुमनताई चव्हाण हिंदी शाळेजवळ घडली. अकबर शेख, अब्दुल शेख आणि समीर शेख आपली छेड काढतात,अशी तक्रार आरोपीच्या मानलेल्या बहिणीने केली होती. यामुळे संतप्त झालेल्या आरोपीने शाळा परिसरात तिघांवर गोळीबार केला. या हल्ल्यात अकबर शेख याचा जागीच मृत्यू झाला, तर अब्दुल शेख आणि समीर शेख हे दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# इंडोनेशियात ७.४ तीव्रतेचा भूकंप! एका व्यक्तीचा मृत्यू

■ जकार्ता

**इंडोनेशियामध्ये** आज पहाटे उत्तर मोलुक्का समुद्रात ७.४ रिश्टर तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाला. या भूकंपानंतर समुद्रात त्सुनामीच्या लाटा उसळल्या.भूकंपाने झालेल्या पडझडीत आतापर्यंत एका व्यक्तीच्या मृत्यूची नोंद झाली आहे. प्रशासनाने किनारी भागात हाय अलर्ट जारी केला.

संयुक्त राज्य भूवैज्ञानिक सर्वेक्षणानुसार, भूकंपाची तीव्रता सुरुवातीला ७.८ नोंदवली गेली होती, मात्र नंतर ती ७.४ वर स्थिर झाली. भूकंपाचा केंद्रबिंदू टेरनाटे शहरापासून सुमारे १२० किमी अंतरावर आणि जमिनीखाली १० किमी खोलीवर



होता. भूकंपानंतर उत्तर इंडोनेशियाच्या किनारपट्टीवर लहान लाटा उसळल्या. अमेरिकन त्सुनामी चेतावणी प्रणालीने भूकंपाच्या केंद्रापासून १००० किमी परिघातील इंडोनेशिया, फिलीपिन्स आणि मलेशियाच्या किनारपट्टीसाठी धोक्याचा इशारा दिला. पॅसिफिक त्सुनामी इशारा केंद्राने मलेशिया, फिलीपिन्स, तैवान आणि पापुआ न्यू गिनीला सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. किनारपट्टीवरील नागरिकांना उंच भागात स्थलांतर करण्याचे आणि सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले. इंडोनेशिया पॅसिफिक रिंग ऑफ फायरमध्ये येत असल्याने हा भाग भूकंप आणि ज्वालामुखींसाठी अतिसंवेदनशील मानला जातो. यापूर्वीही या देशाला अनेकदा भूकंप आणि त्सुनामीचा फटका बसला आहे.

# उद्धवरावांची उद्ध्वस्त सेना उबाठा पदाधिकाऱ्याचे स्टेटस

### पक्षांतर्गत नाराजी पसरली

■ कोल्हापूर

**उबाठा** गटातील एका पदाधिकाऱ्याने मोबाईलवर ठेवलेल्या वादग्रस्त स्टेटसमुळे शहरात एकच खळबळ उडाली . उद्धवरावांची उद्ध्वस्त सेना' असा मजकूर आणि वाघाच्या बछड्याला बाटलीतून दूध पाजतानाचे चित्र या स्टेटसमध्ये होते. हे स्टेटस काही मिनिटांतच व्हायरल झाले आणि पक्षांतर्गत नाराजी पसरली. संबंधित पदाधिकाऱ्याने काही वेळातच हे स्टेटस हटवले. अलीकडे झालेल्या महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये अपेक्षित यश न मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असल्याचे बोलले जात आहे. विशेषतः पदवाटपावरून असंतोष असल्याची चर्चा आहे. याचमुळे हा प्रकार घडल्याचे मानले जात आहे. सकाळी सुमारे ९.५० वाजता हे स्टेटस ठेवण्यात आले. पक्ष प्रमुखांनाच आव्हान देणाऱ्या या मजकुरामुळे अनेकांनी त्याची दखल घेतली. चूक लक्षात येताच संबंधित पदाधिकाऱ्याने अवघ्या काही मिनिटांत ते हटवले. या प्रकरणावर स्पष्टीकरण देताना संबंधित पदाधिकाऱ्याने हे स्टेटस आपल्या मुलीकडून चुकून ठेवले गेले असल्याचे सांगितले.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# ऐन उन्हाळ्यात इंधन टंचाईचे चटके

**आखाती** युद्ध कधी संपेल याचा काही नेम नाही आणि युद्ध संपले तरीसुद्धा विस्कटलेली इंधन पुरवठ्याची स्थिती पूर्वपदावर यायला पुढचे सहा सात महिने जातील असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जातो आहे. भारत सरकारने ही सगळी परिस्थिती धरूनच अनेक प्रकारच्या पूर्वतयारीला सुरुवात केलेली आहे. आखाती देशातला इंधन पुरवठा सुखरूप भारतात यावा यासाठी अनेक प्रकारची उपाययोजना केली जाते आहे. तरीदेखील मिळणारे इंधन हे पूर्वीपेक्षा जास्त किमतीने मिळत असल्याने त्याचे परिणाम आता भारताच्या इंधन दरावर होऊ लागलेले आहेत म्हणूनच सरकारने आता व्यावसायिक वापराच्या सिलिंडरमध्ये जवळपास दोनशे रुपयांनी वाढ केलेली आहे ही वाढ होत असतानाच हवाई प्रवास देखील महाग झालेला आहे हीच परिस्थिती पुढच्या महिनाभर राहिली तर घरगुती गॅसचे दर सुद्धा काही प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. आता सरकारपुढे सिलिंडरच्या किमती वाढवणं हे मोठं संकट नसून इंधन पुरवठा सुरळीत राहणं आणि मिळेल त्या देशांकडून सर्व प्रकारचे इंधन मिळवण्याचा प्रयत्न करीत राहाणे हे सर्वात मोठे उद्दिष्ट आहे. काही प्रमाणात इंधनाच्या दरात वाढ झाली तर ती सोसण्याची तयारी भारतीयांनी ठेवावी अशाच प्रकारचा देखील उद्देश दिसून येतो कारण पंतप्रधानांनी लोकसभेमध्ये जेव्हा निवेदन केले त्यावेळी त्यांनी स्पष्ट सांगितलं होतं की येणाऱ्या काळामध्ये परिस्थिती थोडी गंभीर होण्याची शक्यता आहे . अशा परिस्थितीत लोकांनी सर्व प्रकारचे सहकार्य करण्यासाठी आपली मानसिकता तयार ठेवली पाहिजे. कुठली परिस्थिती कुठल्या प्रकारे गंभीर होईल हे सांगता येत नाही. असाच पंतप्रधानाच्या बोलण्याचा अर्थ होतो म्हणूनच ही बदलती परिस्थिती लक्षात घेता भारतासारख्या जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशाला आपला इंधन पुरवठा सुरळीत ठेवायचा असेल तर अनेक प्रकारच्या उपयोजना करणे क्रमप्राप्त ठरते आता होत असलेली ही इंधन दरवाढ स्वीकारण्याशिवाय भारतीयांपुढे पर्याय राहिलेला नाही. त्यातला सर्वात अडचणीचा भाग असा झाला आहे की ज्यांना या वाढीव दराने सिलेंडर घेणे परवडते ते लोक ते घ्यायलाही तयार आहेत. परंतु तितक्या सहजपणे हा सिलेंडर पुरवठा होत नाही हे देखील त्यामागचे कारण लक्षात घ्यावे लागते.

### बेकारीचे संकट

आज मध्यम आकाराच्या हॉटेलमधून दोनशे रुपये ज्यादा दराने सिलिंडर घ्यावे लागत असले तरीसुद्धा ते वेळच्यावेळी मिळत नसल्याने त्यांची अडचण होते स्वाभाविकपणे मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर यासारख्या मोठ्या शहरातील मध्यम आकाराच्या हॉटेलवर मोठेच संकट घोंगावते आहे येणाऱ्या काळामध्ये जे छोटे व्यावसायिक आहेत विशेषतः मुंबईसारख्या महानगरामध्ये खाऊ गल्ली किंवा अगदी हातगाड्या लावून अनेक प्रकारच्या खाद्यपदार्थांची विक्री करणारे स्टॉल असतात त्यांना फेरीवाले देखील म्हटले जाते त्यांना आता हा वाढीव सिलिंडरचा दर परवडण्याची शक्यता दिसत नाही. शिवाय सिलिंडरही वेळच्यावेळी मिळत नसल्याने त्यांचे कोंडी होते आहे. मुंबईतल्या बऱ्याच ठिकाणी हे छोटे व्यवसाय करणारे जे लोक आहेत ते घरगुती सिलेंडर वापरून आपली वेळ मारून नेतात कारण ते दिवसातून एकदाच आपली गाडी लावत असतात. विशेषतः संध्याकाळच्या वेळेला वडापाव किंवा पावभाजी सारखे स्टॉल्स लावून त्यांचा व्यवसाय होत असतो दिवसातून एकदाच स्टॉल लावायचा असल्याने ते व्यावसायिक सिलेंडर न वापरता घरगुती सिलिंडर वापरतात त्याचा दरही कमी असतो परंतु आता या बदलत्या परिस्थितीत त्यांना देखील घरगुती सिलिंडरचा वापर करण्यावर बंदी येण्याची शक्यता आहे. याचा परिणाम असा होणार आहे की मुंबईतील जवळपास २५००० खाद्यपदार्थांचे छोटे स्टॉल्सबंद पडण्याची शक्यता आहे शिवाय मध्यम आकाराचे हॉटेलमध्ये सुद्धा पुरेसा इंधन पुरवठा होत नसल्याने काही हॉटेल्स बंद पडण्याच्या मार्गावर आहेत म्हणजेच येणाऱ्या काळामध्ये पुन्हा एकदा दुहेरी संकटाची चाहूल लागलेली आहे. बेकारी तर येईलच परंतु इंधन दरामध्ये जर सातत्याने वाढ होत राहिली तर महागाईलाही आमंत्रण मिळणार आहे.

### किमतीही भडकणार


पुढच्या दोन-तीन महिन्यांमध्ये निश्चितपणे भारतात भर उन्हाळ्यात इंधन टंचाईचे चटके बसणार आहेत. आणि ते सहन करण्याशिवाय भारतीयांपुढे पर्याय राहिलेला नाही. दुर्दैवाचा भाग असा आहे की ज्यादा पैसे मोजूनही पुरेसा इंधन पुरवठा होत नसल्याने खाद्यपदार्थांचे दर आपोआपच वाढायला लागलेले आहेत. अनेक ठिकाणी हॉटेल्स मधून वाढीव इंधन दराचा वेगळे पैसे आकारले जातात आणि ते पैसे बिलामध्ये समाविष्ट केले जातात. म्हणजे खाद्यपदार्थांच्या किमतीतही वाढ होते आहे शिवाय वेगळा इंधन सरचार्ज ग्राहकांकडून वसूल होतो आहे. एकाच वेळी दोन प्रकारचा भुर्दंड ग्राहकांना सोसावा लागतो आहे. मुंबईसारख्या सतत धावणाऱ्या या महानगरामध्ये ज्याला आपण स्ट्रीट फूड म्हणतो ते मोठ्या प्रमाणावर लोकांना आवश्यक असतं आणि या छोट्या खाद्यपदार्थ पुरवणाऱ्या व्यवसायाला मुंबईमध्ये मोठी मागणी आहे. ज्यामध्ये किमान लाखभर लोक रोजगारही कमवतात तर येणाऱ्या काळाचा विचार केला तर बेकारीचे संकट येऊ शकते. सतत इंधनाचे दर वाढत राहिल्याने खाद्यपदार्थांच्या किमतीत वाढ होऊ शकते. मुंबईचा वडापाव हा सुद्धा पाच ते दहा रुपयांनी वाढण्याची शक्यता व्यक्त होऊ लागलेली आहे. शिवाय इंधन दरात थोडी जरी दरवाढ केली तरीसुद्धा त्याचा वाहतुकीच्या खर्चावर परिणाम होतो आणि वाहतूक खर्चाचा हा भुर्दंड संबंधित कंपन्या किंवा उत्पादक ग्राहकांच्या खिशातून वसूल करत असतात. परिणामी येणाऱ्या काळामध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत वाढ होऊ शकेल विशेषतः दैनंदिन जीवनामध्ये ज्या ज्या गोष्टी लागतात त्या सर्वंच किंमती इंधन दरामुळे भडकण्याची शक्यता आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

मनाचं पुस्तक अशा व्यक्तिसमोर उघडा, ज्याला ते मनापासून वाचता येईल, नाहीतर फक्त पाने चाळणारे खूपजण असतात. शेवटी मनातलं सांगायला मनाची माणसं लागतात, मानाची नव्हे.

## पंचांग



**शुक्रवार ३ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** चैत्र कृष्ण प्रतिपदा**
**नक्षत्र - चित्रा**
**जन्मराशी :-**
**००-०१ ते ०६-२८ कन्या**
**०६-२९ ते २४-०० तूळ**

**रवी उदय- ०६-३२,**
**रवी अस्त- १८-५२**

**गुडफ्रायडे, छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मृतिदिन, श्री शिवाजी महाराज रथोत्सव -कोल्हापूर**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)





## तंदूरी पापलेट फ्राय



★ **साहित्य:** - ३ पापलेट अखंड स्वच्छ केलेली, १/२ कप घट्ट दही, १ लिंबाचा रस, आलं लसूण पेस्ट, १ टेबलस्पून तंदूरी मसाला, १/२ टीस्पून हळद, मीठ चवीनुसार, १ टेबलस्पून बेसन, ऑरेंज रेड फूड कलर, तांदळाचं पीठ कोटिंगसाठी, तेल, १ टीस्पून धणेपूड, १ टीस्पून चाट मसाला, पापलेट भाजण्यासाठी तेल.

★ **कृती:** - पापलेट स्वच्छ धुवून त्याला खाचे पाडून घ्या. त्याच्यावर लिंबाचा रस घालून छान चोळून घ्या. छोट्या वाडग्यात दही, आलं लसूण पेस्ट, तंदुरी मसाला, हळद, मीठ, बेसन, धणेपूड हे सर्व साहित्य छान एकत्र करा. मीठ घालताना जरा कमीच घाला कारण तंदूरी मसाल्यातसुद्धा मीठ असते. त्यात कलर घालून पुन्हा छान मिक्स करा. पापलेटला हा मसाला छान लावून घ्या. पोटाच्या आत देखील हा मसाला छान भरून घ्या. आता हे पापलेट मसाला मुरण्यासाठी १५ मि.झाकून ठेऊन द्या.
१५ मिनिटानंतर गॅस चालू करून त्यावर पॅन ठेवावा. त्यात तेल टाका. तेल गरम झाले की पापलेट तांदळाच्या पिठामध्ये घोळवून घ्या आणि दोन्ही बाजूने छान खरपूस फ्राय करून घ्या. खायला देताना त्यावर थोडा चाट मसाला भुरभुरा.




# सनरायझर्स हैदराबाद संघाचा पहिला विजय

## कोलकात्याच्या रघुवंशीची अर्धशतकी खेळी वाया

**कोलकात्याच्या ईडन गार्डनवर आज कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध झालेला आयपीएलचा सहावा सामना सनरायझर्स हैदराबादने ६१ धावांनी जिंकला. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने ट्रॅव्हिस हेड (४६) आणि अभिषेक शर्मा (४८) यांच्या वादळी खेळीच्या बळावर निर्धारित षटकात ८ बाद २२६ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात कोलकात्याला १६ षटकांत सर्वबाद १६१ धावांपर्यंत मजल मारता आल्याने या स्पर्धेत सलग दुसरा पराभव पत्कारावा लागला. या पहिल्या विजयासह हैदराबादने या स्पर्धेच्या गुणतालिकेत दोन गुण नोंदवले.**



■ कोलकाता

**कोलकाता** नाइट रायडर्सने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. मग हैदराबादचे सलामीवीर ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा यांनी सुरुवातीपासून कोलकात्याच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढून चौकार आणि षटकार ठोकले. या जोडीने संघासाठी ४.१ षटकांत ५० धावांचा टप्पा गाठला. त्यानंतर त्यांनी आपली फटकेबाजी सुरू ठेवली. हैदराबादची धावसंख्या ८२ वर पोहोचताच कार्तिक त्यागीच्या ५ व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर ट्रॅव्हिस हेड षटकार मारण्याच्या नादात झेलबाद झाला. त्याने २१ चेंडूंत ३ षटकार आणि ६ चौकारांसह ४६ धावा केल्या. मग ब्लेसिंग मुझारबानीने आपल्या नवव्या षटकात ईशान किशन (११) आणि अभिषेक शर्माला (२१ चेंडूंत ४८ धावा) बाद केल्याने हैदराबादचा संघ काहीसा बॅटफुटवर गेला. अनिकेत वर्मा १ धाव करून माघारी परतला. एकामागून एक विकेट जात असताना हेनरिक क्लासेन आणि नितीश कुमार रेड्डी यांनी अधूनमधून चौकार ठोकून संघाचा मोर्चा सांभाळला. या जोडीच्या खेळीमुळे हैदराबादने १८ षटकांत ५ बाद २०० धावा पूर्ण होताच वैभव अरोराच्या गोलंदाजीवर नितीश कुमार रेड्डी सीमारेषेवर झेलबाद झाला. त्याने २४ चेंडूंत ४ चौकार आणि १ षटकासह ३९ धावा केल्या. मग सलील अरोरा शून्य धावेवर बाद झाल्यानंतर हेनरिक क्लासेनने काही चांगले फटके मारले आणि तो ३५ चेंडूंत ५२ धावा करून तंबूत परतला. शिवांग कुमार एक चौकार ठोकून डावाच्या शेवटच्या चेंडूवर झेलबाद झाला. हर्ष दुबे ३ चेंडूंत ९ धावा करून नाबाद राहिला. परिणामी हैदराबादला ८ बाद २२६ धावापर्यंत मजल मारता आली.

या धावसंख्येचा पाठलाग करताना कोलकात्याचा सलामीवीर फिन ॲलनने धडाकेबाज फलंदाजी सुरू केली. मात्र तो ७ चेंडूंत २८ धावा करून गोलंदाज हर्ष दुबेकडेच झेल देऊन बाद झाला. तिसऱ्या क्रमांकावर आलेला रघुवंशी हैदराबादच्या गोलंदाजांचा समाचार घेत असताना उनाडकटच्या पाचव्या षटकाच्या सहाव्या चेंडूवर कर्णधार अजिंक्य रहाणे झेलबाद झाला. त्याने १० चेंडूंत ८ धावा केल्या. सहाव्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर कॅमेरॉन ग्रीनला गोलंदाज ईशान मलिंगाने धावचित केले. त्याने फक्त २ धावा केल्या. कोलकात्याच्या पावरप्लेच्या ६ षटकांत ३ बाद ७४ धावा झाल्या होत्या. रघुवंशी २७ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. त्याला रिकू सिंहने चांगली साथ दिली. त्यामुळे कोलकात्याची धावसंख्या १० षटकांत ३ बाद ११० वर पोहोचली. मग शिवांग कुमारच्या ११ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर रघुवंशी धावचित झाला. रिकूने रमणदीप सिंगची साथ घेऊन फटकेबाजी केली. त्यांच्यासमोर विजयासाठी ४७ चेंडूंत १०० धावांची गरज होती. मात्र रिकूला (३५) उनाडकटने बाद केले. मग सुनील नरेनने मैदानावर उतरताच उनाडकटला दोन खणखणीत षटकार ठोकले. मात्र तो आपल्या चौथ्या चेंडूवर झेलबाद झाला. रमणदीपही आठव्या विकेटच्या रुपात १० धावा करुन बाद झाला. कार्तिक त्यागी ५ धावा आणि वरुण चक्रवर्ती ९ धावेवर बाद करत हैदराबादच्या गोलंदाजांनी कोलकात्याला १६ षटकांत १६१ धावांवर रोखले आणि ६१ धावांनी विजय मिळवला.



# दक्षिण आफ्रिकेच्या ड्युसेनची क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर

■ डर्बन

दक्षिण आफ्रिकेचा अनुभवी फलंदाज रासी व्हॅन डर ड्युसेनने आज आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. दक्षिण आफ्रिका क्रिकेट बोर्डाने २०२६-२७ हंगामासाठी जाहीर केलेल्या करार यादीत स्थान मिळवण्यात अपयश आले. त्यानंतर अवघ्या काही तासांतच त्याने हा निर्णय घेतला. त्याच्या या निवृत्तीमुळे चाहत्यांना मोठा धक्का बसला. ३७ वर्षीय व्हॅन डर ड्युसेनने गेल्या काही वर्षांत दक्षिण आफ्रिका संघासाठी एक विश्वासार्ह फलंदाज म्हणून स्वतःचे स्थान पक्के केले होते. २०१८ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यापासून त्याने संघासाठी मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली.

# सप्टेंबरमध्ये एकदिवसीय मालिका ऑस्ट्रेलिया झिम्बाब्वेत जाणार

**हरारे** - यावर्षी सप्टेंबरमध्ये ३ एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाचा संघ झिम्बाब्वेच्या दौऱ्यावर येणार आहे. हे सामने १५, १८ आणि २० सप्टेंबर रोजी हरारे स्पोर्ट्स क्लबमध्ये खेळले जाणार आहेत. ही मालिका २०२७मध्ये होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या तयारीचा एक महत्त्वाचा भाग आहे, ज्याचे सहआयोजन झिम्बाब्वे, दक्षिण आफ्रिका आणि नामिबिया करणार आहे.

# चेन्नईचा संघ विजयाचे खाते उघडण्यासाठी सज्ज
## आज पंजाब किंग्स संघाला टक्कर देणार

■ चेन्नई

**चेन्नईच्या** एमए चिदंबरम स्टेडियममध्ये उद्या रात्री होणाऱ्या आयपीएलच्या सातव्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्स आणि पंजाब किंग्स संघ भिडणार आहेत. पंजाबचा संघ या स्पर्धेत सलग दुसऱ्या विजय मिळवण्यासाठी मैदानावर उतरणार आहे, तर पहिल्या सामन्यात पराभूत झालेला चेन्नईचा संघ आपल्या विजयाचे खाते उघडण्यासाठी सज्ज झाला आहे. चेन्नईला त्याच्या घरच्या मैदानावर पराभूत करणे पंजाबसाठी सोपे नसणार आहे. त्यामुळे हा सामना रोमांचक होण्याची दाट शक्यता आहे.

राजस्थानविरुद्ध पहिल्या सामन्यात चेन्नईच्या फलंदाजांनी अतिशय खराब कामगिरी केली होती. त्यामुळे चेन्नईला ८ विकेटने पराभूत व्हावे लागले होते. उद्याचा सामना चेन्नईला जिंकायचा असेल तर सलामीवीर संजू सॅमसन आणि कर्णधार ऋतुराज गायकवाड यांना चांगली सुरुवात करावी लागेल. या दोन्ही फलंदाजांना शिवम दुबे, आयुष म्हात्रे, मॅथ्यू शॉर्ट, सरफराज खान, कार्तिक शर्मा यांना चांगली साथ द्यावी लागणार आहे. त्यासोबत पहिल्या सामन्यात चेन्नईच्या गोलंदाजांनाही चांगली कामगिरी करण्यात अपयश आले होते. मॅट हेन्री, खलील अहमद, अंशुल कंबोज, नूर अहमद, जेमी ओव्हरटन यांना आपल्या गोलंदाजीची चमक दाखवणे गरजेचे आहे.

# नागपुरात १७ वर्षांखालील राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धा

■ मुंबई

**महाराष्ट्राच्या** बॉक्सिंग इतिहासात महत्त्वपूर्ण ठरणारी ७ वी १७ वर्षांखालील ज्युनिअर राष्ट्रीय बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा ५ ते ११ एप्रिलदरम्यान नागपूर येथे पार पडणाऱ्या स्पर्धेची अधिकृत घोषणा महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष आणि माजी खासदार राहुल शेवाळे यांनी दादर येथे पत्रकार परिषदेत केली.

या स्पर्धेत देशभरातून निवड झालेल्या युवा खेळाडूंना आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवण्याची मोठी संधी मिळणार आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेत २५० महिला खेळाडू आणि ३५० पुरुष खेळाडू सहभागी होणार असून, एकूण ६०० हून अधिक बॉक्सर्स यावेळी रिंगमध्ये उतरतील. त्यांच्यासोबत १८० प्रशिक्षक व टीम मॅनेजर्स, तसेच संघटनेच्या वतीने ७० अधिकृत कर्मचारी सहभागी होणार आहेत.

# शूर जवान, गुरुदत्त, नवरत्न मंडळ, एसआयईएस कबड्डी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दाखल

■ मुंबई



**विक्रोळी** पूर्व येथील साईबाबा मंदिर शेजारील मैदानातील मॅटवर टागोर नगर मित्र मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या पुरुष गटात शूर जवान, गुरुदत्त मंडळ, नवरत्न मंडळ यांनी विजयी सलामी दिली, महिला गटात एसआयईएस संघाने उपांत्य फेरी गाठली.

उद्घाटनीय सामन्यात मुलुंडच्या शूर जवान मंडळाने चेंबूरच्या यंग स्टारस्पोर्ट्सचा २२-१३ असा पाडाव केला. पूर्वार्धात एकमेकांचा अंदाज घेऊन खेळ केल्याने सामन्यात चुरस पाहण्यास मिळाली. पूर्वार्धात ९-७ अशी आघाडी घेणाऱ्या शूर जवानने उत्तरार्धात आपला खेळ अधिक गतिमान करत ९ गुणांनी आपला विजय साकारला. निखिल चौहानच्या चढायांना निशांत वाळुंजे याची मिळालेली पकडीची साथ त्यामुळे हे शक्य झाले. गुरुदत्त मंडळाने रोहन देवरे, अभिषेक मोरे यांच्या चढाई पकडीच्या उत्तम खेळाने घाटकोपरच्या नवरत्न मंडळावर ३८-१८ अशी सहज मात केली. विश्रांतीला १८-०७ अशी भक्कम आघाडी गुरुदत्तकडे होती. नवरत्न मंडळाने शितलादेवी मंडळाला ३५-१२ असे नमवत दुसरी फेरी गाठली. महिलांच्या सामन्यात एसआयईएस स्पोर्ट्सने हिंद इंडिया स्पोर्ट्सचा प्रतिकार २४-१८ असा मोडून काढत उपांत्य फेरीत धडक दिली.

**जाहीर सूचना**

माझे अशील श्री. संतोष अरविंद कोचळे आणि श्री. अरविंद शिवाजी कोचळे हे अमृत नगर, घाटकोपर (पश्चिम), मुंबई - ४०००८६ येथे स्थित अमृत नगर कोऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडच्या मधू बिल्डींगच्या सी-विंगमधील ३ऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. ३१० धारण केलेल्या सदनिका जागेचे कायदेशीर मालक असल्याचा दावा करीत आहेत. सदर सदनिका सर्वप्रथम श्री. हिरजी पालन गांगर आणि सौ. गंगाबेन हिरजी गांगर यांनी विकासक मे. शेठ एन्टरप्राईजेस यांच्याकडून दिनांक १६.०४.१९८१ रोजीच्या विक्री करारपत्राद्वारे खरेदी केली होती, जे हमीच्या उपनिबंधकांकडे अनुक्रमांक पीएस-१३३२/१९८१ अंतर्गत योग्यरित्या नोंदणीकृत आहे. सदर श्री. हिरजी पालन गांगर आणि सौ. गंगाबेन हिरजी गांगर यांनी सदर सदनिका श्री. ईव्हान नैनन यांना दिनांक ०६.०५.१९९३ रोजीच्या करारपत्रानुसार विक्री आणि हस्तांतरित केली, जे करारपत्र मुद्रांक संकलक, मुंबई यांच्याद्वारे दावा क्र. ३२९३/९४/७२७ दिनांक ३१.१०.१९९४ नुसार अधिकृत करण्यात आले. सदर श्री. ईव्हान नैनन यांनी त्यानंतर सदर सदनिका श्री. राजेंद्र एस. जोशी आणि सौ. तरला राजेंद्र जोशी यांनी विक्री करारपत्र दिनांक २०.०८.२००१ नुसार खरेदी केली, जे हमीचे उप-निबंधक यांच्याकडे अनुक्रमांक बीडीआर-३/५०५४/२००१ अन्वये योग्यरित्या नोंदणीकृत करण्यात आले होते. सदर श्री. राजेंद्र एस. जोशी आणि सौ. तरला राजेंद्र जोशी यांनी शेवटी सदर सदनिका माझे अशील श्री. संतोष अरविंद कोचळे आणि श्री. अरविंद शिवाजी कोचळे यांना विक्री करारनामा दिनांक ०७.०६.२०१६ नुसार विक्री केली जो हमीचे उप-निबंधक यांच्याकडे अनुक्रमांक केआरएल-२/५८३०/२०१६ अन्वये योग्यरित्या नोंदणीकृत आहे.
माझे अशील सदर श्री. संतोष अरविंद कोचळे आणि श्री. अरविंद शिवाजी कोचळे यांनी सांगितले आहे की, श्री. हिरजी पालन गांगर आणि सौ. गंगाबेन हिरजी गांगर आणि श्री. ईव्हान नैनन यांच्या दरम्यान बनलेले दिनांक ०६.०५.१९९३ रोजीचे मूळ करारपत्र (जे करारपत्र मुद्रांक संकलक, मुंबई यांच्याद्वारे दावा क्र. ३२९३/९४/७२७ दिनांक ३१.१०.१९९४ नुसार अधिकृत करण्यात आले होते) आणि श्री. ईव्हान नैनन आणि श्री. राजेंद्र एस. जोशी आणि सौ. तरला राजेंद्र जोशी यांच्या दरम्यान बनलेले दिनांक २०.०८.२००१ रोजीचे मूळ विक्री करारपत्र (जे हमीचे उप-निबंधक यांच्याकडे अनुक्रमांक बीडीआर-३/५०५४/२००१ अन्वये योग्यरित्या नोंदणीकृत करण्यात आले होते) त्यांच्याकडून हरवले/गहाळ झाले आहे आणि ते सर्वोत्तम प्रयत्नांनंतरही सापडत नाही.
तमाम जनतेस याद्वारे उपरोल्लेखित तथ्ये सूचित करण्यात येत आहेत आणि त्यांच्याकडून सदर सदनिकेच्या संदर्भात उपरोल्लेखित दोन्ही करारपत्रांच्या आधारे आणि/किंवा वारसा, उत्तराधिकार, विक्री, हस्तांतरण, भेट, गहाणवट, धारणाधिकार, प्रभार या मार्गे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असल्यास निम्नस्वाक्षरीकार यांना सदर सूचनेच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीमध्ये दाखल करावा, असे न केल्यास सदर सदनिकेच्या संदर्भात कोणत्याही स्वरुपाचा तृतिय पक्षीय दावा नाही आणि जर तसा कोणताही दावा असल्यास तो सोडून दिला असे मानण्यात येईल आणि समजण्यात येईल. त्यानुसार, माझे अशील सदर सदनिका माझ्या अशिलांना योग्य आणि उचित वाटेल अशा अटी आणि शर्तींवर आणि मोबदल्यास कोणत्याही तृतिय पक्ष किंवा व्यक्तीच्या नावे विक्री, वाटप आणि/किंवा हस्तांतरित करण्यास संपूर्णपणे हक्कदार असतील.
दिनांक: ०३.०४.२०२६
मुंबई

(बर्टी जॉन तनेजा)
श्री संतोष अरविंद कोचळे आणि श्री. अरविंद शिवाजी कोचळे यांच्याकरिता ॲडव्होकेट
युनिट क्र. १, तळमजला,
कृष्ण कुंज, गांधी नगर,
झिनोवा हॉस्पिटलच्या मागे,
ला. ब. शा. मार्ग, घाटकोपर (प),
मुंबई - ४०००८६.
मोबाईल: ९९६७०३७३३०

# काश्मिरी पंडितांच्या मालमत्ता रक्षणाची जबाबदारी सरकारची

■ श्रीनगर

**जम्मू-काश्मीरचे** मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी काश्मीर खोऱ्यातून विस्थापित झालेल्या काश्मिरी पंडितांच्या मालमत्ता आणि त्यांच्या धार्मिक स्थळांचे संरक्षण करण्याची जबाबदारी सरकारची असल्याचे स्पष्ट केले आहे.त्यांनी आश्वासन दिले की, जोपर्यंत पंडितांची सुरक्षित आणि सन्मानजनक घरवापसी होत नाही,तोपर्यंत त्यांच्या मालमत्तेचे रक्षण केले जाईल.

विधानसभेत नॅशनल कॉन्फरन्सचे आमदार अर्जुन सिंह राजू यांनी मांडलेल्या खासगी विधेयकाला विरोध करताना



अब्दुल्ला म्हणाले की,समाजात एकमत झाल्यास त्यांचे सरकार या विषयावर कायदा आणण्यास तयार आहे.राजू यांनी केंद्रशासित प्रदेशातील काश्मिरी हिंदू तीर्थक्षेत्रे आणि धार्मिक स्थळांचे उत्तम व्यवस्थापन, संरक्षण, प्रशासन आणि शासनप्रणालीसाठी विधेयक मांडले आहे. या विधेयकाला विरोध करताना मुख्यमंत्री अब्दुल्ला म्हणाले की, काश्मिरी पंडितांना फारच कठिण परिस्थितीत हे खोरे सोडून जम्मू किंवा इतर ठिकाणी स्थायिक

### मुख्यमंत्री अब्दुल्लांचे विधानसभेत स्पष्टीकरण

होण्यास भाग पाडले गेले,हे कोणीही नाकारू शकत नाही.सुरक्षेच्या अभावामुळे त्यांना स्थलांतर करावे लागले आणि जोपर्यंत ही सुरक्षिततेची भावना पूर्णपणे परत येत नाही, तोपर्यंत त्यांच्या परतीची अपेक्षा करता येणार नाही.

देश विदेश

# इटलीत ९५ कोटींच्या पेंटिंग चोरट्यांनी पळवल्या

■ पार्मा

**इटलीच्या** पार्मा शहरातील एका संग्रहालयातून तीन पेंटिंग अवघ्या तीन मिनिटांत चोरी झाली आहेत. चोरी झालेल्या पेंटिंग्जची किंमत सुमारे १० दशलक्ष डॉलर्स म्हणजे जवळपास ९०-९५ कोटी रुपये आहे. संग्रहालयाच्या अहवालानुसार, चोरांनी चित्रे अत्यंत जलद गतीने उचलली आणि संग्रहालयाच्या बागेतून पळ काढला. ही चोरी एखाद्या संघटित टोळीने केली असावी, असा अंदाज आहे. सध्या, चोरी झाल्यानंतर संग्रहालयाकडून कोणतेही अधिकृत निवेदन आलेले नाही. या घटनेची तुलना पॅरिसमधील लूव्र संग्रहालयाच्या एका मोठ्या चोरीशीही केली जात आहे, जिथे सुमारे १०१ दशलक्ष डॉलर किमतीची दागिने आणि इतर वस्तू चोरी झाल्या होत्या.

# बुरूंडीत दारूगोळा गोदामात शक्तिशाली स्फोट! चार ठार

■ गिटेगा

बुरूंडीमधील सर्वात मोठे शहर असलेल्या बुजुंबुरा येथील दारूगोळ्याच्या गोदामात झालेल्या शक्तिशाली स्फोटांत ४ जणांचा मृत्यू झाला. या गोदामाजवळ असलेल्या तुरुंगातील अनेक कैदी जखमी झाल्यामुळे गोंधळ उडाला.

बुजुंबुराच्या दक्षिणेकडील उपनगर असलेल्या मुसागा येथील बुरुंडी राष्ट्रीय संरक्षण दलाच्या मुख्य दारूगोळा गोदामामध्ये विद्युत बिघाडामुळे एकामागून एक मोठे स्फोट झाले. त्यामुळे परिसराला चांगलाच हादरा बसला. या स्फोटांमुळे गोदामाला भीषण आग लागली होती. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन पथक घटनास्थळी दाखल झाले. मात्र पाण्याच्या कमतरतेमुळे बचावकार्यात मोठे अडथळे आहे. या आगीमुळे मालमत्तेचे नुकसान झाले असून बुरुंडी राष्ट्रीय संरक्षण दलाचे बेस कॅम्प पूर्णपणे जळून खाक झाले. स्फोटांच्या तीव्रतेमुळे गोदामाचे छप्पर ५ किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावर फेकला गेला.

# सेझ युनिट्सना स्थानिक बाजारात कमी शुल्कात माल विकण्यास मंजुरी

■ नवी दिल्ली

**जागतिक** मागणी कमी झाल्यामुळे आलेल्या अडचणी लक्षात घेऊन भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्रांतील म्हणजे सेझ उत्पादन युनिट्सना देशांतर्गत बाजारात त्यांचा माल विकण्यासाठी एका वर्षासाठी मर्यादित शुल्क सवलती जाहीर केल्या आहेत. कमी शुल्कात ते माल विकू शकणार आहेत. ही योजना १ एप्रिलपासून लागू झाली असून ३१ मार्च २०२७ पर्यंत वैध राहील. राजस्व विभागाच्या अधिसूचनेनुसार, सेझमध्ये तयार होणाऱ्या आणि देशांतर्गत बाजारात विकल्या जाणाऱ्या वस्तूंवर मूलभूत सीमाशुल्क थोडे कमी आकारले जाईल. तसेच काही प्रकरणांमध्ये कृषी पायाभूत सुविधा व विकास सेसदेखील कमी करण्यात येईल. या सवलतींचा लाभ रसायने, खते, कापड, पादत्राणे आणि यंत्रसामग्री यांसारख्या विविध उत्पादनांना मिळणार आहे. ही सूट फक्त त्या सेझ युनिट्सना मिळेल ज्यांनी ३१ मार्च २०२५ पर्यंत उत्पादन सुरू केलेले आहे, असे ३१ मार्च रोजीच्या अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# अटारी-वाघा सीमेवरील प्रसिद्ध रिट्रिटच्या वेळेत बदल

### सुरक्षा व्यवस्था सुरळीत होणार

■ अमृतसर

**ऐतिहासिक** लष्करी परंपरा असलेल्या भारत-पाकिस्तान सीमेवरील प्रसिद्ध रिट्रिटच्या वेळेत बदल करण्यात आला आहे.

ही रिट्रिट सेरेमनी अटारी-वाघा सीमेवर दररोज होत असून देशभक्तीने वाहणारा हा समारंभ पाहण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो लोक या ठिकाणी येत असतात. ही रिट्रिट आता सायंकाळी साडेपाच वाजता सुरू होऊन ६ वाजता संपेल. याआधी ही रिट्रिट ५ वाजता सुरू होऊन साडेपाच वाजता संपत होती. देशातील हवामान आणि कमी जास्त होत असलेल्या प्रकाशाचा विचार करून प्रशासनाने वेळेत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. रिट्रिट पाहण्यासाठी आलेल्या देशभक्तांना चांगला अनुभव मिळावा आणि सुरक्षा व्यवस्था सुरळीत व्हावी, यासाठी हा बदल करण्यात आला आहे.

रिट्रिटच्या वेळेत झालेला हा बदल काल १ एप्रिलपासून लागू करण्यात आला आहे. बीटिंग रिट्रिट सेरेमनी ही भारत-पाकिस्तान सैनिकांकडून केली जाणारी एक विशेष परंपरा आहे. यामध्ये उत्साह, शिस्त आणि देशभक्तीची झलक पाहायला मिळते.ही रिट्रिट पाहण्यासाठी लोकांचा प्रचंड उत्साह असतो.

# चीनमध्ये गृहनिर्माणावर परिणाम! फ्लॅटमध्ये अस्थी ठेवण्यास बंदी

■ बीजिंग

**चीनमध्ये** रिकामे फ्लॅट खरेदी करून त्यामध्ये नातेवाईकांच्या अस्थी ठेवण्याच्या वाढत्या प्रथेला आळा घालण्यासाठी सरकार कठोर पावले उचलण्याच्या तयारीत आहे. यासाठी बोन श अपार्टमेंट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रथेवर बंदी घालणारा नवा कायदा आणण्याची तयारी सुरू आहे. या प्रस्तावित कायद्यानुसार, सार्वजनिक स्मशानभूमींव्यतिरिक्त इतरत्र मृतदेह दफन करणे किंवा दफनस्थळावर स्मारक बांधण्यावरही निर्बंध घालण्यात येणार आहेत.

चीनमध्ये स्मशानभूमींचे दर सातत्याने वाढत असून शहरांमध्ये जागेची कमतरता जाणवत आहे. त्यामुळे गुहुई फांग या नावाने ओळखल्या जाणाऱ्या फ्लॅटमध्ये अस्थी ठेवण्याची प्रथा वाढली आहे. घरांच्या किमतींमध्ये अलीकडच्या

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा



काळात मोठी घसरण झाल्याने अनेक लोक रिकामे फ्लॅट खरेदी करून त्यांचा वापर अस्थी ठेवण्यासाठी करत आहेत. स्मशानभूमीच्या तुलनेत हा पर्याय स्वस्त ठरत असल्याचे सांगितले जाते. अशा फ्लॅट्समध्ये मेणबत्त्या, लाल दिवे लावून त्यांना पूजास्थळाचे स्वरूप दिले जाते. अनेकदा बंद पडदे किंवा पूर्णपणे सील केलेल्या खिडक्यांवरून अशा फ्लॅट्सची ओळख पटते.चीनमध्ये अंत्यसंस्काराचा खर्च जगात दुसऱ्या क्रमांकावर महाग असल्याचे सांगितले जाते. स्मशानभूमीची जागा साधारणपणे २० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर मिळते, तर घरांसाठी ७० वर्षांचा वापराचा अधिकार मिळतो. यामुळेच अनेक नागरिक फ्लॅटला पर्याय म्हणून निवडत आहेत. अशा प्रकारे घरांचा वापर केल्याने गृहनिर्माण व्यवस्थेवर परिणाम होत असून बाजाराचे संतुलन बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# सोलापूरमध्ये पित्याने ३ लेकरांना विष पाजून स्वत:ही आयुष्य संपवले

■ सोलापूर

**सोलापूर** जिल्ह्यात कौटुंबिक वादातून एका पित्याने टोकाचे पाऊल उचलत स्वतःचे आयुष्य संपवले. तर आपल्या तीन लेकरांनाही विष पाजले. या घटनेत भीमा वाघमारे (३४) यांचा मृत्यू झाला तर तीनही मुलांवर सोलापूर शासकीय रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार असून असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे गावातील भीमा वाघमारे एका सिमेंट कंपनीत सुरक्षा रक्षक म्हणून काम करत होते. गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्यात पत्नीमध्ये घरगुती कारणांवरून सतत वाद होत होते. वाद विकोपाला गेल्यानंतर काही दिवसांपूर्वी त्यांची पत्नी माहेरी निघून गेली होती. नातेवाईकांनी दोघांमध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला. मात्र पत्नीने सासरी परत येण्यास नकार दिला होता. या पार्श्वभूमीवर मानसिक तणावाखाली असलेल्या भीमा वाघमारे यांनी टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती आहे.

# मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे यश मालमत्ता, पाणीकराची विक्रमी वसुली



■ भाईंदर

**मिरा-भाईंदर** महापालिकेने ३१ मार्च २०२६ रोजी मध्यरात्री पर्यंत पालिकेने २५८ कोटी ४८ लाख रुपये इतक्या मालमत्ता कराची वसुली केली आहे. मालमत्ता कर वसुलीत मागील वर्षाच्या तुलनेत २८ कोटींनी वाढ झाली आहे. पालिकेने ९८ टक्के इतकी विक्री पाणीपट्टी देखील वसुली केली आहे.

मालमत्ता कर हे महापालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी मालमत्ता कर वसुलीसाठी थकीत कर वसुलीस प्राधान्य देण्याबरोबर विविध प्रभावी उपाययोजना राबविल्या होत्या. कर वसुली प्रभावी होण्यासाठी संकेतस्थळ तसेच ॲपबाबत जनजागृती करण्यात आली होती. या आवाहनाला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. ऑनलाईन पध्दतीने १ लाख ६७ हजार नागरिकांनी १२३ कोटी १० लाख रुपये भरले. तर १३५ कोटी रुपये रोख आणि धनादेशाद्वारे प्राप्त झाले. मागील वर्षी २३० कोटी ९७ लाख रुपयांची मालमत्ता कर वसुली झाली होती. यंदा त्यात २८ कोटींनी वाढ झाली आहे. महापालिकेने पाणीपट्टी वसुलीसाठी विशेष मोहीम राबवली होती. त्या अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या पथकामार्फत थकबाकीदारांची यादी तयार करणे, त्यांना नोटिसा देणे, जनजागृती करणे, न वटलेल्या धनादेशाची वसुली करणे, नळपुरवठा खंडित करणे इत्यादी प्रकारची कार्यवाही करण्यात आली. पालिकेच्या या विशेष मोहिमेला यश आले. त्यानुसार ३१ मार्च पर्यंत १०९ कोटी ९० लाख रुपयांची पाणीपट्टी वसुल करण्यात यश मिळवले. एकूण मागणीच्या ९८.७९ टक्के वसुली करण्यात पालिकेने यश मिळवले आहे.

# शक्तीपीठ महामार्गात साताऱ्याचा समावेश! सुधारित आराखडा मंजूर

■ मुंबई

**नागपूर-गोवा** शक्तीपीठ महामार्गाच्या सुधारित आराखड्याला राज्य सरकारने मंजुरी दिली असून, या नव्या आराखड्यात सातारा जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या मार्गात मोठे बदल करण्यात आले आहेत. सुधारित आराखड्यानुसार नांदेड, हिंगोली, परभणी, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील मार्गरचनेत बदल करण्यात आला आहे. तर सातारा जिल्ह्याचा नव्याने समावेश करण्यात आल्याने प्रकल्पाचे महत्त्व अधिक वाढले आहे. मार्गातील बदलांमुळे प्रकल्पाचा खर्च सुमारे १.०१ लाख कोटी रुपयांवर पोहोचला असून, महामार्गाची लांबीही पूर्वीच्या आराखड्यापेक्षा ५४ किमीने वाढणार आहे. सुधारित आराखड्यानुसार हा महामार्ग सुमारे ७६० किमी लांबीचा असणार आहे. या महामार्गामुळे नागपूर ते गोवा प्रवासाचा कालावधी १८ तासांवरून केवळ ८ तासांवर येणार आहे. राज्यातील १३ जिल्हे, ४० तालुके व सुमारे ४०० गावे या मार्गाने जोडली जाणार आहेत.

पान १ वरून

# भोंदू खरातचे चाकणकरांच्या बहिणीसह अनेकांचे आधार व पॅन घेऊन व्यवहार

भोंदूबाबा अशोक खरातने अनेकांचे आधारकार्ड आणि पॅन कार्ड घेऊन कारनामे केल्याची माहिती आहे. जगदंब आणि समता पतसंस्थेत खरात हाच १३० खात्यांना वारसदार आहे. त्यांचे खाते थेट खरातच्या मोबाईल क्रमांकावर लिंक होते. यामध्ये रुपाली चाकणकर यांची बहीण व पुतण्याच्या नावाच्या खात्याचाही समावेश आहे. या खात्यांच्या माध्यमातून १०० कोटीहून अधिक रुपयांचे खरातने स्वत:च व्यवहार केले आहेत. आधारकार्ड आणि पॅन कार्ड खातेदारांच्या मोबाईलला लिंक होणे अपेक्षित असताना ते खरातच्या क्रमांकाला कसे लिंक होते? असा प्रश्न निर्माण झाला. याप्रकरणी दोन्ही पतसंस्थेचे चेअरमन आणि व्यवस्थापकाची एसआयटीने चौकशी केली जाणार आहे.

दरम्यान, आजच्या सुनावणीसाठी सुरक्षेच्या कारणास्तव खरातला प्रत्यक्ष न्यायालयात न आणता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर केले होते. न्यायालयाच्या आदेशानुसार दुपारी सुनावणी सुरू झाली. कोर्ट रूममध्ये लावलेल्या चार मोठ्या स्क्रीनवर अशोक खरात हजर झाला . तो गुलाबी रंगाचा टी-शर्ट, वाढलेली दाढी आणि दोन्ही हात एकमेकांवर धरून उभा होता. न्या. बी. एन. ईचपुरानी यांनी त्याचे नाव विचारले असता, त्याने अत्यंत धीम्या आवाजात उत्तर दिले. सुनावणीदरम्यान सरकारी वकील ॲड. शैलेंद्र बागडे आणि तपास अधिकाऱ्यांनी खरातच्या कृत्यांचा पाढा वाचला. खरातने लग्नाचे आमिष दाखवून पीडितेवर अत्याचार केला, ज्यामुळे ती गर्भवती राहिली. त्यानंतर त्याने तिला काही गोळ्या आणि जडीबुटीचे औषध देऊन तिचा गर्भपात घडवून आणला. या गोळ्या कुठून आणल्या आणि त्या औषधात काय होते, याचा तपास करणे बाकी आहे. खरात पीडितेला तू अप्सरा आहेस असे सांगून भुरळ घालत असे आणि तिचे शोषण करत असे. खरात पीडितेच्या नातेवाईकांकडून आधार कार्ड आणि पॅन कार्डची मागणी करत होता. आज या सर्वाबाबत खरातच्या तपासासाठी ७ दिवसांची पोलीस कोठडी मागण्यात आली. तर खरातच्या वकिलांनी वाढीव कोठडीला विरोध करत याआधी १४ दिवस पोलीस कोठडी दिली आहे. आता पुन्हा ७ दिवस कोठडीची गरज नसल्याचा युक्तिवाद केला. खरात प्रकरणात नाशिकमधील डॉक्टरांची चौकशी झाल्याचीही माहिती आहे. गर्भपात करण्यासाठी कोणते डॉक्टर आणि फार्मासिस्ट त्याला मदत करत होते याचा तपास एसआयटीकडून सुरु आहे. याशिवाय भोंदू खरातचा १३०० ते १४०० कोटींच्या नाफेड कांदा घोटाळ्यात सहभाग असल्याचा आरोप झाला आहे. श्री व्यंकटेश फार्मर प्रोड्युसर कंपनी या कंपनीमार्फत तो कांदा खरेदी विक्री व्यवहार करायचा. मार्च २०२४ मध्ये संशयास्पदरित्या कंपनीला नाफेडची मान्यता मिळाली.

# समृद्धी अपघात! ट्रक चालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

■ जालना

**जालना** जिल्ह्यात नागपूर - समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघाताने संपूर्ण परिसर हादरला. या घटनेत आठ महिला कामगारांचा मृत्यू झाला तर ५ जन गंभीर जखमी आहेत. याप्रकरणात ट्रक चालकाने मद्यप्राशन केल्याची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी त्याच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला. या दुर्घटनेनंतर मृत आणि जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात आणताच नातेवाईकांनी आक्रोश केला.


## महावितरण — ई-निविदा

महावितरण कंपनीच्या नोंदणीकृत ठेकेदारांकडून कोल्हापूर मंडल कार्यालय अंतर्गत ई-निविदा द्वारे "१००% DDF योजनेअंतर्गत ३३ के.व्ही., ११ के.व्ही., एच.टी. ओव्हरहेड लाईन भूमिगत करणेसाठी व संबंधीत कामांसाठी निविदा क्र. SE/KC/Tech/१००% DDF/Shifting with Conversion/Kop R-II/T-०७/२०२६-२७ निविदा रक्कम रु. ९६२.९२ लाख सह सदर निविदा प्रसिध्द करणेत येत आहे.

महावितरण ई-निविदा वेबसाइट https://etender.mahadiscom.in/eatApp : वर बिड कागदपत्रांची उपलब्धतेची तारीख ०२.०४.२०२६ (०५:००) पासून निविदा भरण्याची अंतिम तारीख २३.०४.२०२६ (२३:५५) पर्यंत, अधिक माहिती संकेत स्थळावर उपलब्ध.

संपर्क क्र.७८७५७६९०९६.

HO PR No. -८०/२६ अधीक्षक अभियंता (कोमं), कोल्हापूर

## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ

म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र.:- का. अ. (शहर)/ मुं. झो. सु.मंडळ/ ई-निविदा/मससंम/०१/२६-२७**

कार्यकारी अभियंता (शहर) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३९, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४८४) हे जिल्हा उपनिबंधक/शहर / मुंबई शहर जिल्हा यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकूण **०७** कामाकरीता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. विस्तृत निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ http://mahatenders.gov.in, वर उपलब्ध असतील. निविदा विक्री **दिनांक ०६.०४.२०२६ सकाळी ०१.०५ पासून दिनांक १३.०४.२०२६ सायंकाळी १५.००** पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त **https://mahatenders.gov.in,** संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (शहर)/ मुं. झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (शहर),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

CPRO/A/250

Follow us: @mhadaofficial

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

## MAHATRANSCO — E-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. | Description | Estimated Cost (Rs.) | EMD to be Paid (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 1 | EE/EHV/P Dn/ Panvel/Tender-01/ 2026-27 | Work of hiring of LM vehicle with driver on outsource basis for The Executive Engineer, **EHV Projects Division, Panvel** | 5,99,906.16 | Rs. 5999/- |

**Date of sale: - (From) 02.04.2026 (10:00 Hrs) to 16.04.2026 (10:00 Hrs.)**
**Opening of technical bid -16.04.2026(10:05 Hrs.) and Price bid –16.04.2026(16:00 Hrs.).**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The EE- 7768000502 /AEE - 9407282823
**Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER,**
**EHV PROJECTS DIVISION, M.S.E.T.C.L., PANVEL**

## MAHATRANSCO — RFx (E-TENDER) NOTICE

MSETCL invites online bids from reputed and registered contractors of appropriate class with MSETCL. Please visit Mahatransco website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| RFx (Tender) No. | Name of work | Estimated cost in Rs. | EMD (Rs.) | Tender Fee incl. GST (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 7000039506 | AMC for replacement of installed failed Converter Transformer 298.6 MVA (including dismantling) by spare Converter Transformer (298.6 MVA) of either Pole-1 or Pole-2 in case of failure at HVDC Terminal Station, Padghe for the year 2026-27. | INR 50,00,000/- (including taxes) | INR 50,000/- | INR 590/- |

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of download of RFx (e tender) documents | From - 03.04.2026 from 00:00 hrs. to 20.04.2026 up to 10:00 hrs. |
| 2 | Date of submission of RFx (e tender) | 20.04.2026 up to 10:00 hrs. |
| 3 | Date of technical bid opening | 20.04.2026 at 11:00 hrs. (If possible) |
| 4 | Date of commercial bid opening | 20.04.2026 at 13:00 hrs. (If possible) |

**Contact Person: The Executive Engineer (ADM),** HVDC RS (O&M) Circle, Padghe, Mob. No.: 9011021483
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in**

Sd/-
**Superintending Engineer**
**HVDC RS O&M Circle, Padghe**

## जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की आमच्या अशिलांनी दिनांक **१२.१२.२०२५ रोजीचा विकास करार नोंदणी क्र.बीओएम(डब्ल्यू-आर)/एचएसजी(टीओ)/६५९०** असा असून तो उपनिबंधक, बोरिवली, मुंबई यांच्या कार्यालयात नोंदणीकृत करण्यात आलेला आहे, जो **खाली नमूद केलेल्या मालमत्तेच्या पुनर्विकासाबाबत गोराई (२) शुभारंभ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड या सहकारी गृहनिर्माण सोसायटीसोबत** करण्यात आलेला आहे, त्याचे नोंदणीकृत कार्यालय **सी.टी.एस.क्र.४६, ४७, प्लॉट क्र.२१३, आर.एस.सी.-३६,** गोराई २, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०००९१ येथे आहे.

कोणा व्यक्तिस खाली नमूद केलेल्या मालमत्तेसंदर्भात वारसा, प्रभार, सुखभोग हक्क, प्रलंबित खटला, हिस्सा, विक्री, गहाणखत, भाडेपट्टा, धारणाधिकार, परवाना, बक्षीस, ताबा, नियुक्ती, वहिवाट, जप्ती, तारण, न्यायनिर्णय, कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा किंवा प्राधिकरणाचा हुकूमनामा किंवा आदेश, किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोजा किंवा हक्क यांद्वारे कोणताही दावा, मागणी, हितसंबंध, शिर्षक, अधिकार किंवा आक्षेप असल्यास त्यांनी सदर दाव्याबाबत सर्व सहाय्यक कागदपत्रांसह, या सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत, खाली नमूद केलेल्या पत्त्यावर अधोस्वाक्षरी करणाऱ्यास कळवणे आवश्यक आहे, असे करण्यात कसूर केल्यास, सदर व्यक्तीचा असा कोणताही दावा, अधिकार, शिर्षक, पात्रता, हितसंबंध इत्यादी असल्यास, त्या व्यक्तीने सोडून दिला आहे आणि/किंवा त्यावरील हक्क त्यागला आहे असे मानले जाईल; आणि आमच्या अशिलाशी संबंधित व्यवहार पुढे सुरू ठेवला जाईल. या सूचनेच्या प्रकाशनानंतर १४ दिवसांचा कालावधी उलटल्यावर, खालील मालमत्तेच्या संदर्भातील कोणतेही दावे, अधिकार, मागण्या, शिर्षक, हितसंबंध, आक्षेप किंवा वाद विचारात घेतले जाणार नाहीत.

**वर संदर्भित अनुसूची:**

सी.टी.एस. क्र. ४६ व ४७ असलेला सुमारे १३१४.५१ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा प्लॉट तसेच त्यावरील गोराई (२) शुभारंभ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड या ज्ञात सोसायटीची इमारत, जी सी.टी.एस. क्र. ४६, ४७, प्लॉट क्र. २१३, आर.एस. सी.- ३६, गोराई २, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०००९१ येथे स्थित आहे, जी महसूल गाव बोरिवली, तालुका बोरिवली, मुंबई उपनगर जिल्हा, नोंदणी जिल्हा व उपजिल्हा मुंबई शहर व मुंबई उपनगर यांच्या हद्दीत येथील सर्व भाग व खंड आणि चतुसिमा पुढीलप्रमाणे:

उत्तर : संलग्न क्लस्टर प्लॉट क्र. २१२,
दक्षिण : संलग्न प्लॉट क्र. एमआयजी २७ व २८,
पूर्व : संलग्न क्लस्टर प्लॉट क्र. २१४,
पश्चिम : ९.०० मीटर रुंद रस्ता आर.एस.सी - ३६

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०३.०४.२०२६

सही/-
**लॉफोर्ट ॲडव्होकेट्स**
२०२, दुसरा मजला, एलिट स्केअर, पेरिन नरिमन स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४००००१

## बृहन्मुंबई महानगरपालिका

### वृक्ष प्राधिकरण

### जाहीर सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (२४ जानेवारी २०२१ सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदीनुसार **परिमंडळ - ३** मधील **एच/प** विभागातील **०२** प्रस्ताव आणि **के / दक्षिण** विभागातील **०१** प्रस्ताव तसेच **एच / पूर्व** विभागातील **०३** प्रस्ताव असे एकूण **०६** प्रस्तावास ८ (६) अन्वये मा. म. न. पा. आयुक्त, अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची **मंजुरी प्राप्त झाली आहे.**

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे/ पुनर्रोपित करणेबाबत तपशील हा म.न.पा.च्या mcgm.gov.in -----> बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी -----> विभाग आणि खाते -----> खातेनिहाय माहिती पुस्तिका -----> उद्याने व वृक्ष प्राधिकरण -----> कागदपत्रे -----> वृक्षांची परवानगी २१ दिवस या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ----->४८२ (एच/प ), ४८३ ( के / दक्षिण), ४८४ (एच/पूर्व), ४८५(एच/पूर्व), ४८६ (एच/प), ४८७ (एच/पूर्व) - परि. ३

**उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय,**
उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांचे कार्यालय,
वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय,
२ रा मजला, इम्बोल्ट पेंग्विन कक्ष,
संत सावता माळी मार्ग,
भायखळा (पूर्व) मुंबई - ४०० ०२७.

**दुरध्वनी क्र. २३७४२१६२** **Email** - dysg.ta@mcgm.gov.in

सही/-
उद्यान अधिक्षक व
वृक्ष अधिकारी


पीआरओ/२३/जाहि./२०२६-२७

जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.

मुंबई । शुक्रवार
३ एप्रिल २०२६
नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

# वीर दासचे हॉरर विश्वात पदार्पण

**अभिनेता** आणि विनोदवीर वीर दास आता एका नव्या प्रयोगासाठी सज्ज झाला आहे. त्याच्या दिग्दर्शनाखाली 'बारा नंबर' या 'फाऊंड फुटेज' धाटणीच्या भयपटाची निर्मिती होणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. त्याच्या 'झ्झू प्रॉडक्शन' या बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती केली जाणार असून, यापूर्वीच्या 'हॅपी पटेल: खतरनाक जासूस' या विनोदी चित्रपटानंतर वीर दासने आता भयपट या गंभीर विषयाकडे आपले पाऊल वळवले आहे. या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा वीर दास आणि कवी शास्त्री हे दोघे एकत्रितपणे सांभाळणार आहेत. या दोघांची जोडी त्यांच्या अनोख्या सादरीकरणासाठी ओळखली जाते. त्यामुळे भयपट या प्रकारात ते काहीतरी वेगळे देतील, अशी चर्चा चित्रपट वर्तुळात आहे. 'बारा नंबर' हा चित्रपट प्रचलित भयपटांच्या चौकटीबाहेर जाणारा असेल, असा दावा निर्मात्यांकडून करण्यात आला आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण येत्या जून महिन्यात मुंबईत सुरू होणार आहे.









# शाहरुख खानच्या ताफ्यात नवी लक्झरी व्हॅन

**बॉलिवूडचा** बादशाह शाहरुख खान त्याच्या शाही जीवनशैलीसाठी ओळखला जातो. विशेषतः आलिशान चारचाकींचा तो शौकिन आहे. आता त्याच्या आलिशान गाड्यांच्या संग्रहात आणखी एका महागड्या गाडीची भर पडली आहे. शाहरुखने नुकतीच १ कोटी ४० लाख रुपये किमतीची 'मर्सिडीज-बेंझ व्ही-क्लास' ही लक्झरी एम.पी.व्ही. खरेदी केली आहे. वांद्रे येथील त्याच्या 'मन्नत' बंगल्याचे नूतनीकरण सुरू असल्याने तो सध्या 'पूजा कासा' या तात्पुरत्या निवासस्थानी राहत असून, याच ठिकाणी या नवीन कोऱ्या गाडीचे दर्शन झाले आहे.

ही गाडी घेणाऱ्या भारतातील मोजक्या व्यक्तींमध्ये शाहरुखचा समावेश झाला आहे. यापूर्वी क्रिकेटपटू हार्दिक पंड्या आणि त्याची मैत्रिण माहिएका शर्मा यांनी ही गाडी खरेदी केली होती. मार्च महिन्याच्या सुरुवातीला या गाडीचे बुकिंग सुरू झाले होते आणि शाहरुखला मिळालेली ही गाडी देशातील सुरुवातीच्या काही वितरणांपैकी एक आहे. शाहरुखच्या ३० ते ५० कोटी रुपयांच्या गाड्यांच्या ताफ्यात ही गाडी सर्वाधिक आरामदायी मानली जात आहे.

# 'मर्दानी'च्या यशाची हॅट्ट्रीक

**यशराज** फिल्म्सच्या 'मर्दानी ३' या चित्रपटाने चित्रपटगृहातील यशानंतर आता ओटीटी. प्लॅटफॉर्मवरही आपली मोहोर उमटवली आहे. राणी मुखर्जीची मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट नेटफ्लिक्स इंडियावर पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. विशेष म्हणजे, या तिसऱ्या भागाच्या यशामुळे या मालिकेतील जुन्या चित्रपटांनाही नव्याने पसंती मिळत असून, 'मर्दानी'चे तिन्ही चित्रपट सध्या नेटफ्लिक्सच्या 'टॉप १०' यादीत स्थान टिकवून आहेत. 'मर्दानी ३' (२०२६) पहिल्या क्रमांकावर, 'मर्दानी' (२०१४) पाचव्या क्रमांकावर, तर 'मर्दानी २' (२०१९) सातव्या क्रमांकावर आहे.

भारतीय चित्रपटसृष्टीत महिला पोलिसावर आधारित यशस्वी ठरलेली ही एकमेव मोठी फ्रँचायझी ठरली आहे. चित्रपटगृहात ५३ कोटी रुपयांहून अधिक गल्ला जमवून या भागाने संपूर्ण मालिकेतील सर्वाधिक कमाई करण्याचा विक्रम आधीच प्रस्थापित केला आहे. 'मर्दानी ३'ने आपल्या प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी ४ कोटींची कमाई केली होती, जी राणी मुखर्जीच्या सोलो चित्रपटांमधील आतापर्यंतची सर्वात मोठी सलामी ठरली. चित्रपटगृहात ५० दिवस पूर्ण केल्यानंतर आता ओटीटीवरही या चित्रपटाची जादू कायम असल्याने राणी सध्या प्रचंड आनंदी आहे. राणीच्या कारकिर्दीला ३० वर्षे पूर्ण होत असताना मिळालेले हे यश विशेष महत्त्वाचे मानले जात आहे.

# सलमानचा मानधनास नकार; पण...

**बॉलिवूडचा** सुपरस्टार सलमान खान आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध निर्माता दिल राजू तसेच दिग्दर्शक वंशी पैदीपल्ली यांच्यातील सहकार्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. या चित्रपटाबाबतची सर्वात मोठी चर्चा म्हणजे सलमान खान या प्रकल्पासाठी आपले ठराविक मानधन



न घेता नफ्यामध्ये हिस्सा या तत्त्वावर काम करणार असल्याचे समजते. म्हणजेच, या चित्रपटाच्या बॉक्स ऑफिसवरील कामगिरीवरच सलमानची कमाई अवलंबून असेल. सोशल मीडियावर या चित्रपटाची घोषणा करताना सलमानने 'दिल, दिमाग, जिगर से...' असे कॅप्शन दिले आहे. या चित्रपटात सलमानसोबत दाक्षिणात्य अभिनेत्री नयनतारा मुख्य भूमिकेत दिसणार असून, तिला या चित्रपटासाठी १० कोटी रुपये मानधन दिले जाणार असल्याचे वृत्त आहे.

# अजय देवगण आणि ओम राऊत पुन्हा एकत्र

**बॉलिवूड** अभिनेता अजय देवगण आणि दिग्दर्शक ओम राऊत यांची जोडी पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येण्याची शक्यता आहे. २०२० मध्ये आलेल्या 'तानाजी: द अनसंग वॉरियर' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर मोठे यश मिळवले होते आणि तो अजय देवगणच्या कारकिर्दीतील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला होता. आता ही यशस्वी जोडी 'अनसंग वॉरियर' या मालिकेतील पुढचा भाग घेऊन येण्याच्या तयारीत असल्याचे वृत्त आहे. अजय देवगण ऐतिहासिक महाकाव्यासाठी ओम राऊतशी चर्चा करत आहे. या चित्रपटातून पुन्हा एकदा एका महान मराठा योद्ध्याचे शौर्य आणि पराक्रम राष्ट्रीय स्तरावर मांडण्याचा त्यांचा मानस आहे. जेव्हा ओम राऊतने या नवीन कथेचे वाचन अजय देवगणसमोर केले, तेव्हा त्याने तातडीने या प्रकल्पासाठी होकार दिला. या विषयामुळे अजय देवगण कमालीचा उत्साहित असल्याचे समजते. हा चित्रपट भव्य स्वरूपात आणि उच्च दर्जाच्या तांत्रिक कौशल्यासह साकारला जावा, अशी अजयची इच्छा आहे.



# अखेर 'दादा' पडद्यावर अवतरणार

**भारतीय** क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि 'दादा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सौरव गांगुलीच्या जीवनावर आधारित चित्रपटाची प्रतीक्षा आता संपली आहे. अभिनेता राजकुमार राव याने समाज माध्यमांवर या चित्रपटाच्या शीर्षकाची अधिकृत घोषणा केली असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे चित्रीकरणही सुरू झाले आहे. 'दादा: द सौरव गांगुली स्टोरी' असे या चित्रपटाचे नाव निश्चित करण्यात आले आहे. राजकुमार रावने या घोषणेसोबतच काही छायाचित्रेही प्रसिद्ध केली आहेत. यामध्ये चित्रपटाचा 'क्लॅपबोर्ड' आणि कोलकाता येथील ऐतिहासिक ईडन गार्डन्स स्टेडियममधील 'सौरव गांगुली स्टँड' पाहायला मिळत आहे. या स्टँडचे अनावरण २०१७ मध्ये करण्यात आले होते, जे बंगालच्या या महान क्रिकेटपटूच्या सन्मानार्थ तेथे कायमस्वरूपी उभारले गेले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन विक्रमादित्य मोटवाने करणार असून लव रंजन याची निर्मिती करत आहेत. विशेष म्हणजे, या भूमिकेसाठी राजकुमार रावने आपल्या शरीरयष्टीत मोठा बदल केला आहे. यापूर्वीच्या 'निकम' चित्रपटासाठी त्याने सुमारे १० किलो वजन वाढवले होते. आता गांगुलीच्या भूमिकेत शिरण्यासाठी त्याने पुन्हा एकदा शारीरिक परिवर्तनावर काम सुरू केले आहे.



# हनुमान जयंतीच्या दिवशी रामायण चित्रपटाचा टीझर! उत्सुकता शिगेला

■ मुंबई

**दिग्दर्शक** नितेश तिवारी यांच्या भव्य 'रामायण' चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे 'रामायण' चित्रपटाचा टीझर आज हनुमान जयंती निमित्त प्रदर्शित झाला. त्यात रणबीर कपूर यांचा भगवान श्रीराम म्हणून पहिला लूक दाखवण्यात आला आहे. चित्रपट चाहत्यांना रणबीर कपूरचा श्रीरामाचा लुक आवडत आहे. मात्र, चित्रपटात हनुमानाची भूमिका करणारे सनी देओल या टीझरमध्ये दिसले नाहीत. टीझरमध्ये श्रीराम अयोध्येचा राजा बनण्यापासून ते सीता आणि लक्ष्मण यांच्यासोबत वनवासाला



जाण्यापर्यंतच्या महत्त्वाच्या घटना दाखवल्या आहेत. पण हनुमान कुठेही दिसत नाहीत. सनी देओल सध्या चित्रपटाच्या पुढील भागाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहेत. त्यांनी पहिल्या भागासाठी फक्त सुमारे १५ मिनिटांचा छोटा कॅमिओ आधीच शूट केला आहे. दुसऱ्या भागात त्यांना अधिक स्क्रीन टाइम मिळणार आहे. पहिला भाग मुख्यतः भगवान राम यांच्या अयोध्येतील जीवनावर आणि ते एक महान योद्धा व राजा कसे बनतात यावर आधारित आहे. त्यामुळेच हनुमानाचा लूक टीझरमध्ये दाखवण्यात आलेला नाही. या चित्रपटाचे निर्माते नमित मल्होत्रा आहेत. दिग्दर्शन नितेश तिवारी यांनी केले आहे.

# गुलमोहर झाडाची फांदी कोसळून एकाचा मृत्यू

■ मुंबई

**राज्यात** अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. परंतु मुंबईत कुठेही पाऊस किंवा वादळी वारा नसताना कुलाबा भागात गुलमोहर झाडाची फांदी कोसळल्याची घटना घडली.या दुर्घटनेमध्ये एका इसमाचा मृत्यू झाला. तर काही जण जखमी झाले. जखमींना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

कुलाबा परिसरात पोलीस महासंचालक कार्यालयासमोर काल बुधवारी सायंकाळी चार वाजता अचानक गुलमोहर झाडाची फांदी तुटून पडली. त्यावेळी तिथून जाणाऱ्या वाहनांवर ही झाडाची फांदी कोसळली. चार वाहने या फांदीखाली सापडली होती. या अपघातात काही नागरिकही अडकले होते. त्यातील अनिल भगोजी गोरे (४५) या गंभीर जखमीला तातडीने सेंट जॉर्ज रुग्णालयात हलवण्यात आले. पण उपचारादरम्यान अनिल गोरे यांचा मृत्यू झाला. तर अन्य जखमींवर उपचार सुरू आहेत.

# विधान परिषद निवडणुकीची चाहूल भाजपात उमेदवारीसाठी चुरस

## नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार?

■ मुंबई

**राज्यातील** विधान परिषदेच्या ९ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे २०२६ रोजी संपत असून या रिक्त जागांसाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. विधानसभेतील सध्याच्या संख्याबळानुसार भाजपाचे सुमारे पाच उमेदवार निवडून येऊ शकतात. पण पक्षात इच्छुकांची संख्या मोठी असल्याने उमेदवारीसाठी चुरस वाढली आहे.

विशेषतः राज्यसभेच्या निवडणुकीत संधी न मिळालेल्या नेत्यांनी आता विधान परिषदेवर लक्ष केंद्रित केले आहे. सध्या भाजपाचे यात रणजीतसिंह मोहिते पाटील, संदीप जोशी, दादाराव केचे आणि संजय केणेकर हे चार आमदार निवृत्त होत आहेत. यापैकी विद्यमान आमदारांना पुन्हा संधी दिली जाणार की नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपाचे माजी मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, माधवी नाईक, रणजीतसिंह निंबाळकर, राम सातपुते यांच्यासह अनेक नेते इच्छुक आहेत. विशेषतः केशव उपाध्ये यांना यावेळी संधी मिळते का? याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. पक्षाची बाजू ठामपणे मांडणाऱ्या उपाध्ये यांना यापूर्वी संधी मिळाली नाही. तसेच त्यांचे माध्यम प्रमुख पद आणि मुख्य प्रवक्ते पद हे देखील हातातून गेले आहे. तसेच दर वेळेस त्यांचे नाव परिषदेसाठी चर्चेत असते. पण यावेळी त्यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच फलटण परिसरात प्रभाव वाढवण्यात यशस्वी ठरलेले रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांचे नावही आघाडीवर आहे.

# रवि वर्मांचे यशोदा व कृष्ण चित्र १६७.२ कोटी रुपयांना विकले



■ मुंबई

**प्रख्यात** चित्रकार राजा रवि वर्मा यांच्या 'यशोदा आणि कृष्ण या सुप्रसिद्ध तैलचित्राची विक्री तब्बल १६७.२ कोटी रुपयांना होऊन भारतीय कला क्षेत्रात नवा इतिहास रचला गेला आहे. सफ्रॉनआर्ट यांनी मुंबईत आयोजित केलेल्या स्प्रिंग लाइव्ह लिलावात हे चित्र सुमारे १८ दशलक्ष डॉलर (१६७.०२ कोटी रुपये) इतक्या विक्रमी किमतीत विकले गेले.

या लिलावात अवघ्या ७ मिनिटांतच या चित्रासाठी जोरदार बोली लागून हा विक्रम प्रस्थापित झाला. त्यामुळे यशोदा आणि कृष्ण ही कलाकृती आधुनिक भारतीय कलेच्या इतिहासातील सर्वात महागड्या चित्रांपैकी एक ठरली आहे.ही अमूल्य कलाकृती सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संस्थापक आणि उद्योगपती अब्जाधीश सायरस पूनावाला यांनी विकत घेतली. त्यांनी या खरेदीला सन्मान आणि कर्तव्य असे संबोधले. तसेच हे चित्र राष्ट्रीय ठेवा असल्याने ते सर्वसामान्यांसाठी प्रदर्शनात ठेवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या विक्रीमुळे यापूर्वीचा एम. एफ. हुसेन यांच्या चित्राचा विक्रम मोडीत निघाला.

# कामगार निवृत्ती वय ६० वर्षे करण्याचा प्रस्ताव फेटाळला

## नवी मुंबईत सत्ताधारी भाजपाला सरकारचा धक्का

■ नवी मुंबई

**नवी मुंबई** महापालिका कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे करण्याचा सत्ताधारी भाजपाचा प्रस्ताव राज्य सरकारने फेटाळला आहे. महासभेत मंजुरी मिळालेला हा प्रस्ताव राज्य सरकारने नाकारल्यामुळे २१ मार्च रोजी निवृत्त होणाऱ्या आठ कर्मचाऱ्यांना सेवामुक्त व्हावे लागले. तसेच या निर्णयामुळे महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे.तर राज्य सरकारचा सत्ताधारी भाजपाला हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

गेल्या महिन्यात ११ मार्च रोजी नवी मुंबई पालिकेच्या स्थायी समितीने एक ठराव मंजूर करून 'नवी मंबई महानगरपालिका सेवा विनियम, २०२६' तयार केले होते. या विनियमांत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे निश्चित करण्यासह सेवा अटींबाबत विविध तरतुदी करण्यात आल्या होत्या. त्यानंतर २० मार्च रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव बहुमताने मंजूर करण्यात आला. परंतु त्यासाठी राज्य सरकारची मंजुरी आवश्यक असल्याने हा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आला होता. मात्र हा प्रस्ताव राज्य सरकारच्या विभागाने नाकारला आहे. यावर पालिकेचे सभागृह नेते सागर नाईक यांनी नगरविकास विभागाचा हा निर्णय दुर्दैवी असून आम्ही शासनाला योग्य ते स्पष्टीकरण देऊ असे म्हटले आहे.

# सूर्या योजनेचा पाणीपुरवठा ७ दिवस बंद! कमी दाबाने पाणी



■ वसई

**वसई-विरार** शहर महानगरपालिकेच्या 'सूर्या' पाणीपुरवठा योजनेतील पाणी ४ एप्रिल ते १० एप्रिलदरम्यान पूर्णपणे बंद राहणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) कडून तांत्रिक कामांसाठी सात दिवसांचा शटडाऊन घेतल्यामुळे हा निर्णय घेतला गेला आहे.

महानगरपालिकेला दररोज सुमारे ४०० दशलक्ष लिटर पाण्याची गरज असताना, सध्या 'सूर्या' योजनेतून २०० दशलक्ष लिटर आणि एमएमआरडीए मार्फत १५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत आहे. शटडाऊन काळात १५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार असल्याने शहरात पाण्याची तूट निर्माण होईल.

नागरिकांना कमी दाबाने व अपुऱ्या प्रमाणात पाणीपुरवठा होणार असून महानगरपालिकेकडून झोनिंग पद्धतीने पाणी वितरण केले जाणार आहे. ४ एप्रिलला विरार, ५ एप्रिलला नालासोपारा, ६ एप्रिलला नवघर-वसई आणि ७ ते १० एप्रिल दरम्यान पुन्हा हाच क्रम अनुसरण केला जाईल. प्रत्येक भागात सकाळी १० वाजेपासून पुढील दिवशी सकाळी १० वाजेपर्यंत पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

# मंत्रालयात १० हजार डीजी कार्ड गहाळ?

■ मुंबई

**मंत्रालयात** प्रवेशासाठी वापरल्या जाणाऱ्या डीजी ॲप कार्डांबाबत मोठी अनियमितता स्पष्ट झाल्याने मंत्रालय सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले. सुमारे १० हजार कार्ड गहाळ झाल्याची माहिती आहे. मंत्रालयात येणाऱ्या अनेक अभ्यागतांनी प्रवेशानंतर कार्ड परत न केल्यामुळे हा प्रकार झाला.

मंत्रालयात नागरिकांच्या प्रवेशासाठी काही महिन्यांपूर्वी डिजिटल प्रणाली लागू केली होती. या प्रणालीअंतर्गत अभ्यागतांनी मोबाईल ॲपच्या माध्यमातून नोंदणी करून प्रवेश घेताना त्यांना डीजी कार्ड दिले जाते. या कार्डमध्ये संबंधित व्यक्ती कोणत्या विभागात

## सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

जाणार आहे यासह सर्व माहितीची नोंद होते. यामुळे सुरक्षा आणि व्यवस्थापन सुकर होण्याचा उद्देश होता. मात्र याच प्रणालीत त्रुटी आढळली.

आतापर्यंत सुमारे १० हजारांच्या जवळपास कार्ड व्यवस्थापनाला परत मिळाले नाही. मंत्रालयातून बाहेर पडताना अनेकांनी ही कार्ड जमा न करता थेट बाहेर पडल्याची माहिती आहे. त्यामुळे संबंधित कंत्राटदार कंपनी आणि प्रशासनाकडून अशा अभ्यागतांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, ज्यांनी जुने कार्ड परत केले नाहीत, त्यांना पुढच्या वेळी मंत्रालयात प्रवेश दिला जाणार नाही. दरम्यान, या गहाळ कार्डपैकी सुमारे ३०० कार्ड पुन्हा अभ्यागतांनी परत केल्याची माहितीही आहे.

# मेट्रो ९ उद्घाटनाआधीच श्रेयवाद सरनाईक-मेहता आमनेसामने

■ मिरा-भाईंदर

**दहिसर**-मिरा-भाईंदर मेट्रो ९ (दहिसर-काशिगाव) मार्गाच्या उद्घाटनापूर्वीच श्रेयवादाची लढाई रंगली आहे. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक आणि भाजपा आमदार नरेंद्र मेहता शहरातील प्रमुख चौक बॅनरमुळे गच्च भरले आहेत.

मेट्रो प्रकल्पासाठी आपणच पाठपुरावा केला, असा दावा दोन्ही नेत्यांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे उद्घाटनाआधीच महायुतीमध्ये श्रेयासाठी स्पर्धा उघडपणे दिसून येत आहे. या मेट्रो प्रकल्पाला राज्य सरकारकडून मंजुरी मिळाल्यानंतर २०१९ मध्ये प्रकल्पाचे काम सुरू झाले. सुमारे सात वर्षांनंतर दहिसर-काशिगाव हा पहिला टप्पा पूर्ण झाला. उद्या उद्घाटन होणार होते पण आता सोमवार ६ एप्रिलला होणार असल्याचे सांगितले जात आहे.

# अभिनेत्री सोनाली बेंद्रे अडचणीत मावळमधील जमिनीचा वाद कोर्टात




■ पुणे

**हिंदी** चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली बेंद्रे आणि तिचे पती गोल्डी बेहल यांच्या अडचणीत वाढ झाली असून पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील ३० गुंठे जमिनीच्या व्यवहारावरून वाद न्यायालयात पोहोचला आहे.

वडगाव मावळ न्यायालयात चंद्रकांत बाळू शिंदे यांनी दावा दाखल करत, मौजे उकसान येथील सर्व्हे नंबर १२१/१ मधील जमीन बेकायदेशीरपणे खरेदी केल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणात फसवणूक आणि नियमांचे उल्लंघन झाल्याचा दावा करण्यात आला आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, ही जमीन १ एप्रिल १९५७ पासून त्यांच्या आजोबा केसू बाबाजी शिंदे यांच्या नावावर असून त्यावर कुळ हक्क असल्याचा दावा आहे. मात्र, मूळ मालकाने ही जमीन बेकायदेशीररित्या दुसऱ्याला विकली आणि त्यानंतर कुळ हक्क लपवून पुढे सोनाली बेंद्रे आणि गोल्डी बेहल यांना विकण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच डिसेंबर २०२५ मध्ये संबंधित जागेवर वाद झाल्याचाही आरोप दाव्यात नमूद आहे. दरम्यान, बचाव पक्षाने हे सर्व आरोप फेटाळले आहेत.

# नवाकाळ शब्दकोडे-१५६४



### आडवे शब्द –

१. शेळपट सैनिक, वाचावीर ७. कळस, माथा ९. ज्ञाती १०. माळजमीन ११. श्रीविष्णूच्या गळ्यातील माळ १२. भगिनी १४. क्रांतीकारक वासुदेव बळवंत यांचे आडनाव १५. आप्त, सखा १७. देव १९. शारीरिक २१. नाश, जीर्ण होणे २२. दरवाजा २३. माळ, बरोबरी २४. फसवणे, उल्लू बनवणे २६. युवक २७. कुत्रा ३०. ढोंगी, दांभिक ३१. अर्धी ओंजळ ३२. अपहार ३३. केंद्र, मधला भाग ३४. भीती, धास्ती ३६. आवश्यकता, नड ३८. उपस्थित ३९. आजार ४०. परंपरावादी ४२. जवळ, निकट ४३. सहस्रावधी ४५. सौंदर्य ४७. विश्वासघात, गद्दारी ४९. टोचणारा ५०. अगदी प्रमाणात आढळणारे ५१. दुसऱ्याचे वा अंतरावरचे गाव ५३. मूर्खांची लक्षणे या ग्रंथात आहेत ५६. गाव ५८. अशक्त, मंद ५९. कुमक, सहाय्य ६०. मारूतीचे शस्त्र ६१. लक्ष्मीहार ६४. वट, अवैध प्रभाव ६६. वानरांची धिप्पाड जात ६७. गाडगेबाबांच्या भजनातील श्रीकृष्णाचे संबोधन ७१. ओझे ७३. ताकाचा हा प्रकार जिलबीच्या जेवणात असतो ७४. व्याजाने पैसे देणारा ७५. सुंदर स्त्री ७७. निरर्थक ८०. हात राखून खर्च करणे, मितव्यय ८३. गळा ८४. घोकलेले पुन्हा बोलणे ८७. बंध, खोडा ८८. चित्त, अंतःकरण ८९. किंचित अंश ९१. गजानन नावाला समानार्थी शब्द ९२. सापाने टाकलेली त्वचा ९४. चांदी, रौप्य ९६. कसेतरी काम उरकणे ९७. सुट्टीचा वार ९९. प्रेमात पडलेला, लुब्ध १००. गोळीबाराचे छोटे शस्त्र १०१. चांदणी

### उभे शब्द –

१. सर्वात धाकटे मूल २. दलदलयुक्त जागा ३. डोके, मस्तक ४. हरणाचे पिल्लू ५. दिव्य दृष्टीने धृतराष्ट्राला युद्धाचे वर्णन सांगणारा ६. अति अवघड व्रत ७. शिवणकामाचा मोबदला ८. वनस्पतीजन्य लवचिक पदार्थ ९. जाण असलेला, ज्ञानी १३. प्रयत्नांची पराकाष्ठा १६. फिर्याद १८. सासरा २०. रडणे २२. दयनीय २३. मैत्रीण, आठवण २४. मारूतीच्या मूर्तीवरचा लेप २५. एकत्र घरे, वस्ती २६. होडी २७. ध्येय, लक्ष्य २८. रावणाचा मुलगा २९. वाईट गोष्टीला प्रोत्साहन ३०. ढिला, अजागळ ३२. युद्धात मराठ्यांची घोषणा ३३. रगेल ३४. मालक ३५. उकळून काढलेला अर्क ३७. पाण्यात राहणारे प्राणी ४१. नेट, पिच्छा ४२अ. फणसातील खाद्यभाग ४४. अनल, अग्नी ४६. वेतन ४८. मोठ्या आकाराचे ४९. डोंगर फोडून काढलेला रस्ता ५१. प्रतिज्ञा ५२. कपडा, वस्त्र ५४. शंकराचे एक नाव ५५. पाठ्यपुस्तकातील पाठ, अद्दल ५६. वस्तू, पर्वत ५७. परका नसलेला ६१. उदरनिर्वाह ६२. गोळा ६३. नवरा ६५. शरम ६८. पोपट ६९. रामजन्माची तिथी ७०. हळू, मंद गतीने ७२. दृष्टी ७३. औद्योगिक विकास झालेले मोठे शहर ७४. लहान ७६. बाळाच्या गालावर लावलेला काजळाचा ठिपका ७७. हेकट ७८. तुच्छ लेखणे ७९. विकलांग ८१. उणीव ८२. संवत्सर, वर्ष ८५. प्रथा ८६. सामानसुमान ८७. मायेची सावली ९०. बाण ९२. दुष्ट हेतू ९३. श्रीकृष्णाने वसवलेली नगरी ९५. पाणी ९८. संकट, अडथळा •

### नवाकाळ कोडे क्रमांक १५६३ चे उत्तर

**आडवे शब्द** : १. अपराध ४. कालिया ७. गाय ९. अखंडित १२. खरा १३. महिषासूरमर्दिनी १६. झेप १८. शासकीय १९. मदत २०. नकुल २२. आततायी २४. मुक्त २५. राडा २८. नमुना ३०. श्रीराम ३२. चुलतबहीण ३३. दवाखाना ३४. आफत ३६. जलद ३८. गजवदन ४१. कट ४२. कचेरी ४३. कळस ४५. लीन ४६. टपाल ४९. विज्ञान ५१. भारा ५२. हवा ५४. गरजवंत ५५. वहिनी ५६. लिसा ५८. वजनी ६०. नाठाळ ६२. तडकाफडकी ६४. धरा ६६. कणव ६७. मदमस्त ६९. आडकाठी ७०. अतापता ७३. अंध ७४. मारक ७५. कन्याकुमारी ७८. तरंग ७९. नगद ८१. जरासा ८४. यमक ८५. कमावता ८९. पुत्रकामेष्टी ९१. लाजरा ९२. मशाल ९३. शेणामेणाचा ९४. सुकाळ ९५. बंगला ९६. दारा ९७. टवाळखोर ९८. रकाना

**उभे शब्द** : १. अढी २. राख ३. धराशायी ४. काटकी ५. याम ६. विषाद ७. गार ८. यमल ९. अनीन १०. डिझेल ११. तप १४. हिम १५. सुतराम १७. प्रीत १८अ. यमुना २१. कुचंबणा २२. आच्छादन २३. ताटाखालचे मांजर २६. अलगद २७. दणकट २९. मुबलक ३०. श्रीफळ ३१. रात ३५. बिजली ३७. दळणवळण ३९. वन ४०. नटराज ४१. कलह ४४. प्रज्ञा ४७. चंग बांधणे ४८. पूतना ४९. विनीत ५०. नलिकाकूप ५१. भावकी ५३. वास्तपुस्त ५७. साफ ५९. नीरद ६१. ठाकठीक ६३. डच्चू ६५. दंडक ६७. मध ६८. महाग ६९. आरसा कशाला ७०. अमात्य ७१. तारी ७२. तात ७३. अंगयष्टी ७४. मारा ७६. न्याय ७९. नकलाकार ८०. दसरा ८१. जळ ८२. ठेव ८३. सूत्र ८६. माल ८७. ताशेरा ८८. समेट ८९. पुचाट ९०. कातळ ९१अ. जळका ९२. मग

# इराणशी युद्ध सुरूच राहणार! डोनाल्ड ट्रम्पची घोषणा

पान १ वरून

आपण तिथे असण्याचीच गरज नाही पण आपण मित्रराष्ट्रांच्या मदतीसाठी तिथे आहोत.

इराणला अणुशस्त्र उत्पादन करू देणार नाही असे मी २०१५ साली सांगितले होते. आपल्याला आणि इस्त्रायलला इराण सतत त्रास देत आहे. आपल्या तळांवर, आपल्या जवानांवर त्यांनी हल्ला केला. त्यांनी आंदोलन करणाऱ्या स्वतःच्या ४५ हजार लोकांना ठार केले. ४७ वर्षे त्यांचे हल्ले सुरू आहेत. हे आधीच थांबायला हवे होते, बराक ओबामाने त्यांना अब्जावधीची रोकड मदत म्हणून दिली, पण ते सुधारले नाहीत, ते आपला आपल्या राष्ट्राध्यक्षांना हसले. आपले राष्ट्राध्यक्ष चुका करीत राहिले. मी त्या चुका सुधारतो आहे. इराणच्या अणु प्रकल्पांवर मी हल्ला करण्याचा निर्णय घेतला, ते अणुबॉम्ब बनविणार होते, आपण आपल्या या शत्रुला नेस्तनाबूत केले आहे. या ध्येयासाठी जे १३ अमेरिकी जवान शहीद झाले त्यांचा सन्मान करतो. या सर्वांच्या कुटुंबांनी मला विनंती केली की आपली मोहीम फत्ते करा. गॅसचे भाव वाढले आहेत, पण हे तात्पुरते आहे. इराणच्या बॉम्बपासून आपण मुक्त होत आहे. आपला देश मरतुकडा, अपंग झाला होता. आता आपण कणखर झालो आहोत. आपल्याकडे रशिया आणि सौदी मिळून जितके तेल व गॅसचे उत्पादन करतात तितके आपल्याकडे आहे. ज्यांना तेल व गॅससाठी होर्मुज अवलंबून राहावे लागत आहे. त्या देशांनी होर्मुजवर कब्जा घ्यावा, मी या देशांना आवाहन करतो की अमेरिकेकडून तेल आणि वायू विकत घ्या. आपल्याकडे त्याचा भरपूर साठा आहे. आता पुढील दोन ते तीन आठवड्यात आपण इराणवर असा जबरदस्त हल्ला करणार आहोत की, इराण पुन्हा अनेक शतके मागे जाईल. पहिले महायुद्ध, दुसरे महायुद्ध, इराक युद्ध हे सर्व काही वर्षे चालले. या युद्धाला तर फक्त ३२ दिवस झाले आहेत. आपण ते युध्य जिंकू तेव्हा आपण सर्वात बलवान असू. ट्रम्प यांच्या या भाषणावर जगभरातून टीका होत आहे. ट्रम्प दरवेळी त्याच मुद्यावर बोलतात, त्यांना माघार घ्यायची आहे पण सन्मान राहील असा मार्ग सापडत नाही अशी बोचरी टीका सुरू झाली.

# आम्ही कधी युद्ध सुरू केले नाही! स्वतःचा बचाव केला

पान १ वरून – पुढे शासनाला दिलेला पाठिंबा, १९८० च्या युद्धात सद्दाम हुसेनला दिलेली मदत, दीर्घकालीन निर्बंध आणि चर्चेदरम्यान केलेले लष्करी हल्ले-यामुळे हा अविश्वास अधिक वाढला. या सर्व दबावांनंतरही इराण अधिक सक्षम झाला आहे. साक्षरतेचे प्रमाण ३०% वरून ९०% पेक्षा जास्त झाले आहे; उच्च शिक्षणात मोठी वाढ झाली आहे; आधुनिक तंत्रज्ञान, आरोग्य सेवा आणि पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय प्रगती झाली आहे. तथापि, निर्बंध, युद्ध आणि हल्ल्यांचा इराणी जनतेवर झालेला अमानवी परिणाम दुर्लक्षित करता येणार नाही. युद्धामुळे जीवन, घरे आणि भविष्य उद्ध्वस्त झाल्यास लोक जबाबदार व्यक्तींविषयी उदासीन राहू शकत नाहीत. यातून एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो: या युद्धातून नेमके अमेरिकन जनतेचे कोणते हित साधले जात आहे? निरपराध मुलांची हत्या, कॅन्सर उपचार केंद्रांचे नुकसान किंवा एखाद्या देशाला पाषाणयुगात परत पाठवण्याच्या धमक्या यातून अमेरिकेची प्रतिमा सुधारते का? इराणने संवादाचा मार्ग स्वीकारला, करार केले आणि आपली बांधिलकी पूर्ण केली. मात्र, त्या करारातून बाहेर पडण्याचा आणि संघर्ष वाढवण्याचा निर्णय अमेरिकेने घेतला. इराणच्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर हल्ला करणे म्हणजे थेट जनतेवर हल्ला करणे होय. हे केवळ युद्ध गुन्हा नसून, त्याचे परिणाम सीमांच्या पलीकडे जातात. अस्थिरता, आर्थिक व मानवी नुकसान वाढते आणि दीर्घकालीन तणाव निर्माण होतो. अमेरिका इस्त्रायलच्या प्रभावाखाली या संघर्षात उतरली आहे का? इस्त्रायल इराणचा धोका दाखवून पॅलेस्टिनी मुद्यावरून लक्ष हटवत आहे का? हे प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. आज जग एका निर्णायक वळणावर उभे आहे. संघर्षाचा मार्ग अधिक खर्चिक आणि निष्फळ ठरत आहे. संवाद आणि सहकार्याचा मार्ग निवडणे अत्यावश्यक आहे. इतिहासात अनेक आक्रमक नष्ट झाले, पण इराण टिकून राहिला-सशक्त, सन्माननीय आणि अभिमानाने उभा आहे, असे म्हटले आहे.

# नासाचे आर्टेमिस-२ चंद्राकडे झेपावले
## पाच दशकांनंतरची ऐतिहासिक मोहीम

पान १ वरून

उल्लेख आहे. या मोहिमेमध्ये चार अंतराळवीर सहभागी आहेत. रिड वाईजमन, व्हिक्टर ग्रोव्हर, क्रिस्टिनमा कोच आणि जेरेमी हॅन्सन अशी त्यांची नावे आहेत.क्रिस्टीना या एकमेव महिला अंतराळवीर या मोहिमेत सहभागी आहेत. चंद्राच्या जवळ पोहोचणाऱ्या त्या पहिल्या महिला अंतराळवीर ठरतील. वाईजमन हे मोहिमेचे कमांडर आहेत. तर ग्रोव्हर हे वैमानिक आहेत. ते चांद्र मोहिमेवर जाणारे आफ्रिकन-अमेरिकन अंतराळवीर आहेत.

चंद्रावर पुन्हा पाऊल ठेवण्यासाठी आणि तिथे जास्त काळ वास्तव्य करण्याच्या उद्देशाने चाचपणी करण्यासाठी आर्टेमिस मोहीम नासाने हाती घेतली आहे. याआधी २०२२ मध्ये नासाने मानव विरहित आर्टेमिस चाचणी मोहीम यशस्वी केली होती. आताची आर्टेमिस -२ हे त्या मोहिमेचे पुढचे पाऊल आहे. या मोहिमेत अंतराळवीर चंद्रावर उतरणार नाहीत. ते चंद्राच्या सुमारे ७ हजार ४०० किलोमीटर जवळ जाऊन त्याच्या भोवती प्रदक्षिणा घालून तेथील वातावरणात अनेक महत्त्वपूर्ण वैज्ञानिक प्रयोग करणार आहेत. अंतराळात जास्त काळ वास्तव्य करण्याची चाचपणी, खोल अंतराळातील दिशादर्शन आणि दळणवळण प्रणालीची चाचणी, चंद्राभोवती मानवाला सुरक्षितपणे फिरवण्याच्या ओरियन मॉड्युलच्या क्षमतेची पडताळणी करणे, अंतराळयानाचे संचालन, भविष्यातील डॉकिंग-अनडॉकिंग (अंतराळात दोन याने एकमेकांना जोडणे आणि विलग होणे) प्रक्रियेचा सराव करणे आणि भविष्यातील मोहिमांसाठी उपयुक्त अशी माहिती गोळा करणे ही या मोहिमेची उद्दिष्ट्ये आहेत. आर्टेमिस-२ यान चंद्राचा पृथ्वीवरून जो भाग दिसतो त्याच्या मागच्या भागात पोहोचेल तेव्हा ते पृथ्वीपासून ४ लाख किलोमीटर दूर असेल. म्हणजेच अपोलो मोहिमांपेक्षाही अधिक अंतरावर हे यान पोहोचणार आहे.आपले काम पूर्ण केल्यानंतर दहा दिवसांनी आर्टेमिस-२ यान अंतराळवीरांना घेऊन पृथ्वीवर परतेल. प्रशांत महासागरात हे यान उतरवले जाईल.

# राजेश खन्ना - अनिता अडवाणी यांच्यात वैवाहिक नातेसंबंध नाही

पान १ वरून

होती. राजेश खन्ना यांच्या निधनानंतर, त्यांच्या 'आशीर्वाद' या बंगल्यातून आपल्याला बाहेर काढण्यात आल्याचा आरोप केला होता. याप्रकरणी दिंडोशी सत्र न्यायालयाने सन २०१७ मध्ये अनिता अडवाणी यांचा दावा तांत्रिक मुद्यांवर फेटाळून लावला. त्या विरोधात अनिता अडवाणी यांनी त्या हायकोर्टात आव्हान दिले होते. या आव्हान याचिकेवर न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या एकलपीठा समोर सुनावणी झाली. यावेळी राजेश खन्ना यांच्या पत्नी डिंपल कपाडिया, मुलगी ट्विंकल खन्ना आणि जावई अक्षय कुमार यांच्यावतीने जोरदार विरोध करण्यात आला. तसेच उच्च न्यायालयाने यापूर्वी २०१५ मध्ये कपाडिया, ट्विंकल खन्ना आणि अक्षय कुमार यांच्या विरोधातील कौटुंबिक हिंसाचाराची कार्यवाही रद्द केली होती. त्यात, अडवाणी आणि राजेश खन्ना यांच्यातील संबंध हे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याअंतर्गत विवाहाचे संबंध मानले जाऊ शकत नाहीत, असा निर्वाळा न्यायालयाने दिला होता. याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. दोन्ही पक्षाचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निर्णय देताना अनिता यांची याचिका फेटाळून लावली. अनिता अडवाणी यांचे दिवंगत राजेश खन्ना यांच्यासोबतचे नाते कायद्याने 'विवाह' मानला जाऊ शकत नाही. राजेश खन्ना यांनी डिंपल कपाडिया यांच्याशी कायदेशीर विवाह केला होता आणि त्यांचा कधीही घटस्फोट झाला नव्हता. कायद्यानुसार, एखादी व्यक्ती आधीच विवाहित असताना दुसऱ्या कोणाशीही केलेलं नातं 'विवाहाच्या स्वरूपातील' मानलं जाऊ शकत नाही. तसंच अनिता अडवाणी या कधीही डिंपल कपाडिया किंवा त्यांच्या कुटुंबासोबत एकाच घरात एकत्र राहिलेल्या नाहीत. यात कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. 'लिव्ह-इन रिलेशनशिप'मधील प्रत्येक नातं लग्नासारखे नसते , असे ही हायकोर्टाने स्पष्ट करीत याचिका फेटाळून लावली.

# आता मुंबईत जैन प्रीमियर लीग
## १२ संघांना ३१ कोटी रुपये

पान १ वरून – कोटीं रुपयांना विकला गेला. सूरतमधील एका व्यावसायिकाने गुजरात संघ २.३६ कोटी रुपयांना खरेदी केला. जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन स्पोर्ट्सच्या सचिव श्वेता हुंडिया यांनी दिलेल्या माहितीनुसार, या लीगसाठी जैन खेळाडूंकडून तब्बल ६,५०० अर्ज प्राप्त झाले आहेत. टायटल आणि ट्रॉफी प्रायोजकत्वातून ५.११ कोटी रुपयांची कमाई झाली आहे.

जितो अँपेक्सचे अध्यक्ष पृथ्वीराज कोठारी यांनी सांगितले की, लीग आता पारंपरिक धर्मादाय स्वरूपातून बाहेर पडून पूर्णपणे कॉर्पोरेट क्रीडा उपक्रम म्हणून विकसित केली जात आहे. एप्रिल-मे महिन्यांत १२ शहरांमध्ये ४० पेक्षा अधिक सामने खेळवण्याची योजना असून, प्लेऑफ आणि अंतिम सामना मुंबईत होण्याची शक्यता आहे. दरम्यान, संघ मालकांना पहिल्या वर्षी केवळ ५० टक्के फ्रँचायझी फी भरावी लागणार आहे. जितो स्पोर्ट्स फाऊंडेशनकडून प्रशिक्षण, प्रवास आणि इतर खर्च उचलले जाणार आहेत. गैर-जैन गुंतवणुकदारांना एका संघात २० टक्क्यांपर्यंत हिस्सा ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे. हंगामाच्या अखेरीस अतिरिक्त महसुलातील ४० टक्के रक्कम संघांमध्ये वाटली जाणार आहे. या लीगला संपूर्ण क्रीडा-मनोरंजन प्लॅटफॉर्म म्हणून विकसित करण्याचे नियोजन असून, भव्य उद्घाटन व समारोप सोहळ्यांसह सेलिब्रिटींची उपस्थितीही असणार आहे.

## SBI भारतीय स्टेट बँक

कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१

**सूचना**

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भागाचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भागासंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे इश्यूसाठी रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) मेसर्स केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फाइनेंसियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद, तेलंगणा – ५०० ०३२ (इमेल आयडी: **einward.ris@kfintech.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

**भारतीय स्टेट बँक**

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक पासून | प्रमाणपत्र क्रमांक पर्यंत | विभिन्न क्रमांक पासून | विभिन्न क्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०७४०४९२६ | जेम्स डेविड<br>शीला जेम्स | ९९० | ६२०५६१९ | ६२०५६१९ | ८०१०९८४४२५ | ८०१०९८५४१४ |
| २ | ०२५५४३१५ | वेंकटाद्रि कोसाराजू | १००० | २००२८३ | २००२८३ | ७४४७४५१७२१ | ७४४७४५२७२० |
| ३ | ०२४८६३८७ | इंदिरा चक्रवर्ती | १५०० | १९६९०८ | १९६९०८ | ७४४५६९४९३१ | ७४४५६९६४३० |

**वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

**स्थळ:** मुंबई
**दिनांक:** ०३.०४.२०२६
समभागांची संख्या: **३४९०**
स.प्रमाणपत्रांची संख्या: **३**
महाव्यवस्थापक (शेअर्स व बॉण्ड्स)

## जाहीर सूचना

माझे अशील (१) कु. रुबिना युसूफ खान, (२) श्री. सैजाद युसूफ खान, (३) श्री. मुजाहिद युसूफ खान आणि (४) श्री. फैजल युसूफ खान यांनी असे सांगितले आहे की, त्यांची आई सौ. हुसेनजान युसूफ खान या आतापर्यंत अमृत नगर, घाटकोपर (पश्चिम), मुंबई - ४०००८६ येथे स्थित भगिरथी व्हिला कोऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडच्या तळमजल्यावरील सदनिका क्र. बी/५ या सदनिका जागेच्या कायदेशीर मालक होत्या, जी त्यांनी श्री. ठाकूर प्रसाद तिवारी यांच्याकडून विक्री करारपत्र दिनांक ०५.०८.२००२ नुसार खरेदी केली होती, जे हमीचे उप निबंधक, मुंबई यांच्या कार्यालयामध्ये अनुक्रमांक बीडीआर-३/४३७६/२००२ अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आले होते. माझ्या अशिलांची आई सदर श्रीमती हुसेनजान युसूफ खान यांचे दि. ०३.०६.२०२० रोजी मुंबई येथे निधन झाले आणि त्यांचे वडील श्री. युसूफ सय्यद रौफ खान यांचे दि. २८.०८.२०२१ रोजी नवी मुंबई येथे निधन झाले. माझे अशील सदर (१) कु. रुबिना युसूफ खान, (२) श्री. सैजाद युसूफ खान, (३) श्री. मुजाहिद युसूफ खान आणि (४) श्री. फैजल युसूफ खान हे दिवंगत श्रीमती हुसेनजान युसूफ खान यांचे केवळ वारसदार आहेत आणि त्यानुसार, एकत्रितरित्या सदर सदनिकेचे कायदेशीर आणि संपूर्ण मालक आणि हक्कदार आहेत. माझ्या अशिलांनी भगिरथी व्हिला कोऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड यांना सदर संस्थेची सदस्यता व त्यासह सदर सदनिका आणि संबंधित समभाग त्यांच्या संयुक्त नावे हस्तांतरित करण्याकरिता अर्ज केला आहे.

तमाम जनतेस याद्वारे उपरोल्लेखित तथ्ये सूचित करण्यात येत आहेत आणि त्यांच्याकडून सदर सदनिकेच्या संदर्भात वारसा, उत्तराधिकार, विक्री, हस्तांतरण, भेट, गहाणवट, धारणाधिकार, प्रभार या मार्गे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असल्यास निम्नस्वाक्षरीकार यांना सदर सूचनेच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीमध्ये दाखल करावा, असे न केल्यास सदर सदनिकेच्या संदर्भात कोणत्याही स्वरुपाचा तृतिय पक्षीय दावा नाही आणि जर तसा कोणताही दावा असल्यास तो सोडून दिला असे मानण्यात येईल आणि समजण्यात येईल. त्यानुसार, माझे अशील सदर सदनिका माझ्या अशिलांना योग्य आणि उचित वाटेल अशा अटी आणि शर्तींवर आणि मोबदल्यास कोणत्याही तृतिय पक्ष किंवा व्यक्तीच्या नावे विक्री, वाटप आणि/किंवा हस्तांतरित करण्यास संपूर्णपणे हक्कदार असतील.

दिनांक: ०३.०४.२०२६
मुंबई

(बर्टी जॉन तनेजा)
ॲडव्होकेट, उच्च न्यायालय
युनिट क्र. १, तळमजला,
कृष्ण कुंज, गांधी नगर,
झिनोवा हॉस्पिटलच्या मागे,
ला. ब. शा. मार्ग, घाटकोपर (प),
मुंबई - ४०००८६.
मोबाईल: ९९६७०३७३३०

## TENDER NOTICE

**PMC REQUIRED FOR REDEVELOPMENT OF SOCIETY**

Seal offer invited from experience and competent PMC for Redevelopment of society having **48** Residential flats and **42** shops total area in **1507 sq.mtr.** send the details profile with project details (Ongoing and completed), scope of work and payment terms. Submit cheque of Rs. 3000/- (Non Refundable) in favour of the society. Letter to be send the society office

**SAI PRATIKSHA ENCLAVE CO-OP. HSG. SOC LTD.**
Opp. Indralok Phase No. III, New Golden Nest Road, Bhayander (E), Tal. & Dist: Thane - 401 105.

Last date of Submission on **10th April 2026**

Society reserves all the right to accept/reject, Any All proposal without giving any reason

**Contact Society Manager - 9867800252**

## PUBLIC NOTICE

I, Mrs. Pavana Mukesh Bangera, W/o Mr. Mukesh K. Bangera, residing at C-126, Pushpanjali CHS, Vaswani Marg, Near 7 Bungalow Depot, Andheri (W), Mumbai - 400 061, having Aadhaar Card No. 9555 9455 2834, Pan Card No. AIUPB3455G, and I am joint owner of Shree Pushpanjali CHS, Flat No. C-126, Share Certificate no. 53, Distinctive Nos. 00261 to 00265, my name is mentioned as 'PAVANA S. KANCHAN', therefore, my surname 'KANCHAN' to be changed to 'BANGERA' in the society Share Certificate.
Dated this 3rd day of April 2026.

Place: Mumbai
Sd/-
Mrs. Pavana Mukesh Bangera

## TENDER NOTICE FOR REDEVELOPMET

Seal tender invited from experience and competent developers for the Redevelopment work of

**NEELKANTH TOWER CHSL**

Neelkanth Tower situation at Behind Prince Regency, Kanakiya Road, Mira Road (East) Dist Thane, Pincode 401107

Plot area 1779 sqm as per P R card. Existing No of premises having 10 Shop and 46 Flats. Society has conveyance in their favor Interested

STAR ASSOCIATES PMC PVT.LTD.
Vision Yours, Execution Ours.

Bid document can be obtained from PMC office on payment of **Rs 10000 in cash** (non-refundable) from **03.04.2026 to 17.04.2026** between 11.00 am to 5.00pm on working days
Tender should be submitted from **18.04.2026 from 11.00 to 5.00pm** at society office
**Society reserves the right to reject any or all Bids without assigning any reason for doing so**
**Add: Star Associetates PMC Pvt ltd & Apex Associates,**
Office No # Shop No 02, Building No 06, A wing, Green Park, Near Gokul Village, Mira Road (East) 401017.
**Tel: +91 9820818155/9833405487**

## फॉर्म जी

**स्वारस्य अभिव्यक्तीकरिता निमंत्रण**
**सहार इंडस्ट्रिज एलएलपी मोती नारोली, सुरत (गुजरात) येथे विविध प्रकारच्या रंगीत धाग्यांच्या आणि इतर वस्त्रोद्योगाशी संबंधित उत्पादनांच्या निर्मिती क्षेत्रात कार्यरत**

(इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ चे विनियम ३६ए चे उप-विनियम (१) अन्वये)

**संबंधित तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव पॅन आणि सीआयएन/ एलएलपी क्रमांकासह | **सहार इंडस्ट्रिज एलएलपी**<br>**एलएलपीआयएनः** ACA-9088<br>**पॅनः** ADAFS5600F |
| २ | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | ब्लॉक क्र. ९१, पैकी १(बी), भारत पेट्रोलियम समोर, एन.एच.-८, मौजे – मोती नारौली, तालुका – मंगरोल, किम, सुरत, मंगरोल, गुजरात, भारत – ३९४११०. |
| ३. | वेबसाइटची युआरएल | उपलब्ध नाही |
| ४ | ज्या ठिकाणी बहुसंख्य स्थिर मालमत्ता आहेत त्या ठिकाणाचे तपशील | ब्लॉक क्र. ९१, पैकी १(बी), भारत पेट्रोलियम समोर, एन.एच.-८, मौजे – मोती नारौली, तालुका – मंगरोल, किम, सुरत, मंगरोल, गुजरात, भारत – ३९४११०. |
| ५ | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | ३०० एमटी दरमहा |
| ६ | मागील आर्थिक वर्षात विकल्या गेलेल्या मुख्य उत्पादनांचे/सेवांचे मूल्य | वित्तीय वर्ष २०२४-२५ च्या उपलब्ध अद्ययावत वित्तीय अहवालानुसार:<br>प्रमाण: लागू नाही<br>मूल्य: रु. ७७,२९,६८,३६६ |
| ७ | कर्मचारी/कामगारांची संख्या | निरंक (एसबीओडी ने दिलेल्या माहितीनुसार). |
| ८ | दोन वर्षांचे शेवटचे उपलब्ध वित्तीय अहवाल (अनुसूचीसह), कर्जदारांच्या याद्या यासह अधिक तपशील युआरएल वर उपलब्ध आहेत: | cirp.sahar@gmail.com या पत्त्यावर 'रिझोल्यूशन प्रोफेशनल' यांना विनंती पाठवून तपशील मिळवता येतील. |
| ९ | संहितेच्या कलम २५(२)(एच) अंतर्गत रिझोल्यूशन अर्जदारांची पात्रता येथे उपलब्ध आहे: | cirp.sahar@gmail.com या पत्त्यावर 'रिझोल्यूशन प्रोफेशनल' यांना विनंती पाठवून तपशील मिळवता येतील. |
| १० | अभिव्यक्ती स्वारस्य प्राप्त करण्याची शेवटची तारीख | १८.०४.२०२६ |
| ११ | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याची तारीख | २०.०४.२०२६ |
| १२ | तात्पुरत्या यादीवर हरकती सादर करण्याची शेवटची तारीख | २५.०४.२०२६ |
| १३ | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याची तारीख | २७.०४.२०२६ |
| १४. | संभाव्य रिझोल्यूशन अर्जदारांना माहिती ज्ञापन, मूल्यांकन मॅट्रिक्स आणि रिझोल्यूशन प्लॅनची विनंती जारी करण्याची तारीख | २९.०४.२०२६ |
| १५. | ठराव योजना सादर करण्याची अंतिम तारीख | २९.०५.२०२६ |
| १६. | स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठी ईमेल आयडीची प्रक्रिया करा | cirp.sahar@gmail.com |
| १७ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या एमएसएमई म्हणून नोंदणी स्थितीची माहिती. | एमएसएमई नोंदणीकृत |

**सही/-**
**सन रिझोल्यूशन प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड**
**मे. सहार इंडस्ट्रीज एलएलपी (सीआयआरपी अंतर्गत)**
यांचे रिझोल्यूशन प्रोफेशनल
त्यांचे अधिकृत स्वाक्षरीकर्ता
**श्री. इकबाल सिंग गांधी यांच्यामार्फत**

**दिनांक: ०३.०४.२०२६**
**ठिकाण: अहमदाबाद**
**आयबीबीआय नोंदणी क्र.:** IBBI/IPE-0064/IPA-1/2023-24/50043
**एएफए वैधता:** ३०.०६.२०२६ पर्यंत

नवाकाळ
• मुंबई | शुक्रवार ३ एप्रिल, २०२६ • पान -८



## सिद्धिविनायक मंदिराचा १८२ कोटी रुपयांचा महसूल

**मुंबई -** सिद्धिविनायक मंदिराने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी १८२ कोटी रुपयांचा विक्रमी महसूल जाहीर केला आहे. हा आकडा मागील आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील १३३ कोटींच्या तुलनेत सुमारे ३५ टक्के अधिक आहे. ट्रस्टला सुमारे १५५ कोटीं रुपयांची अपेक्षा होती.

# रेल्वेची कोकणवासियांना सापत्न वागणूक

**मुंबई हे लक्षावधी कोकणवासियांचे दुसरे घर आहे. कोकणातील प्रत्येक घरातला माणूस हा थेट मुंबईशी जोडलेला आहे. मुंबई आणि कोकण हे एकमेकांपासून वेगळे होऊच शकत नाही. मुंबईसुध्दा कोकणपट्टीचाच भाग आहे पण हे नाते भारतीय रेल्वेला आणि रेल्वे मंत्र्यांना हे ठाऊक नसावे किंवा कोकणवासियांकडे मुद्दाम दुर्लक्ष केले जात असावे. कोकणी माणूस हा शांत आणि संयमी आहे. पण त्याला सापत्न वागणूक देऊन रेल्वे उत्तर प्रदेश, बिहार आणि अन्य प्रांतांना झुकते माप देणार असेल तर एक दिवस कोकणी माणसाच्या संतापाचा कडेलोट होईल व त्याचा परिणाम सत्ताधारी पक्षाला भोगावा लागेल, असे कोकणवासीय आता उघड बोलू लागले आहेत. कोकण रेल्वे सुरू झाली ती कोकणवासियांसाठी. पण कोकण रेल्वेच्या मार्गावरून अन्य राज्यांतील लोकांचे कसे भले होइल एवढेच दिल्लीच्या रेल भवनमधून बघितले जात आहे.**

डॉ. सुकृत खांडेकर

**उबाठा** सेनेचे मुंबईतील खासदार अरविंद सावंत यांनी कोकणातील प्रवाशांना रेल्वे सापत्न वागणूक देत आहे असे संसदेत बोलताना थेट आरोप केला. कोकण रेल्वे ही कोकणवासियांसाठी आहे की उत्तर भारतीयांसाठी असा प्रश्न विचारला. तरीही रेल्वे मंत्रालय ढिम्म बसून आहे. उन्हाळी सुट्टीत रेल्वे जादा रेल्वे गाड्यांची व्यवस्था करते, पण रेल्वेला कोकणवासियांचा विसर पडलेला दिसतो. मध्य रेल्वेने उन्हाळी सुट्टीसाठी दिड हजार विशेष फेऱ्यांची घोषणा केली, पण त्यातल्या साडे चारशे फेऱ्या बिहारसाठी तर साडे तिनशे फेऱ्या उत्तर प्रदेशसाठी आहेत. मुंबईचे भावनिक व निकटचे नाते असलेल्या कोकणासाठी केवळ ३६ फेऱ्या जाहीर केल्या आहेत. कोकणावर अन्याय झाल्याचे खासदार अरविंद सावंत यांना समजते ते मुंबई- कोकणातील सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधींना कळत नाही का? सत्ताधारी पक्षातील आमदार खासदारांनी रेल्वे मंत्र्यांकडे आग्रह धरून व पाठपुरावा करून कोकणासाठी अधिक रेल्वे सेवा खेचूनआणली पाहिजे. पण तसे का घडत नाही? रेल्वेमंत्री त्यांना विचारत नाहीत की सत्ताधारी त्यांच्याकडे आग्रह धरीत नाहीत?

दादर- रत्नागिरी पॅसेंजर ही दिवा - रत्नागिरी झाल्यामुळे कोकणवासियांमध्ये मोठा संताप आहे. तो आमदार, खासदार किंवा मंत्र्यांना दिसत नाही का? मुंबई- गोरखपूर ही प्रायोगिक तत्वावर सुरू झालेली रेल्वे आता नियमित धावू लागली आहे.? युपीच्या भाजपाच्या एका खासदाराने पत्र दिल्यानंतर रेल्वेमंत्री त्यांची मागणी त्वरीत मान्य करतात मग आपले लोकप्रतिनिधी कुठे कमी पडतात? मुंबईतून कोकणात जाणारी व प्रवाशांना सोयीची ठरलेली रत्नागिरी दिवा पॅसेंजर गाडी ही पूर्वीप्रमाणेच दादर स्थानकापर्यंत चालविण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केली होती. पण या मागणीला रेल्वेने पाने पुसली आहेत, अशी चर्चा ऐकायला मिळत आहे. शिवसेना शिंदे गटाचे खासदार रविंद्र वायकर यांनी दिल्लीत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन कोकणातील प्रवाशांच्या व्यथा मांडल्या. पण रत्नागिरी - दादर किंवा छत्रपती शिवाजी टर्मिनस अशी सेवा सुरू होणे शक्य नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. कोकणातील लोक थेट दादर किवा सीएसटीला आले पाहिजेत याची काळजी लोकप्रतिनिधींनीच घेतली पाहिजे पण दादरवरून सुटणारी ट्रेन रद्द करून ती दिव्यावरून सोडून कोकणवासियांची किती गैरसोय होत आहे हे रेल्वेमंत्र्यांना कोण पटवून देणार? युपी- बिहार किंवा अन्य राज्यांशी जोडलेल्या रेल्वे गाड्या दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस किंवा सीएसटीपर्यत बिनदिक्कत येऊ शकतात, मग सावंतवाडी किंवा रत्नागिरीवरून येणाऱ्या प्रवाशांना दिव्याला का सोडून दिले जाते? कोकण रेल्वेवर कोकणवासियांचा पहिला हक्क आहे. मुंबई- कोकण यांच्यात जोडणारा सेतू म्हणून कोकण रेल्वे उभारण्यात आली आहे. प्रा. मधु दंडवते यांच्या अथक प्रयत्नातून व त्यांनी संसदेत केलेल्या पाठपुराव्यातून कोकणवासियांचे स्वप्न साकार झाले. पण त्याची फळे बाहेरील राज्यांना जास्त मिळू लागली आहेत. कोकण रेल्वे मार्गावर उत्तरेतील व दक्षिणेतील लांबपल्ल्याच्या गाड्यांची संख्या अधिक आहे व त्यांना प्राधान्य दिले जात आहे. कोकण कन्या, मांडवी एक्स्प्रेसमध्ये कोकणातील प्रवाशांना साधे तिकीटही मिळत नाही. सावंतवाडी टर्मिनस लवकर परिपूर्ण व्हावे याकडे रेल्वेचे प्राधान्य नाही. कोकण रेल्वे पश्चिम रेल्वेच्या मार्गाला जोडल्यानंतर कोकणातील प्रवशांना थेट मुंबईकडे येणे आणखी कठीण होऊन बसणार आहे.



## बारामती पोटनिवडणुकीत ३० अर्ज महायुतीचा बिनविरोधासाठी प्रयत्न

■ बारामती

**राज्यात** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या या मतदारसंघासाठी होणाऱ्या निवडणुकीत महायुतीकडून बिनविरोध निवडणुकीचा प्रयत्न सुरू असला तरी ३० जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याची माहिती आहे.

सुनेत्रा पवार यांची निवडणूक बिनविरोध करण्याचा महायुतीचा भर आहे. पण ३० अर्जापैकी किती अर्ज भरले जातात, किती पात्र होतात आणि किती अर्ज मागे घेतले जाणार हे अद्याप अस्पष्ट आहे. ही निवडणूक बिनविरोध होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तर सुनेत्रा पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी ६ एप्रिलला मुख्यमंत्री बारामतीत येणार असल्याची माहिती आहे. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून मतदान २३ एप्रिल २०२६ रोजी होणार आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ६ एप्रिल असून अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ९ एप्रिल आहे. अर्जदारांमध्ये हिंदुस्थान जनता पार्टी मधून सतीश कदम, सागर भिसे यांनी अपक्ष तर न्यू राष्ट्रीय समाज पार्टी तर्फे राजू घुटूकडे यांचा समावेश आहे. हे तीनही उमेदवार बारामतीच्या बाहेरचे आहेत.

## मुंबईत स्मार्ट पार्किंगसाठी सल्लागार नियुक्तीला मंजुरी

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेने शहरातील पार्किंग समस्या सोडवण्यासाठी स्मार्ट पार्किंग प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी सल्लागार नेमण्याच्या प्रस्तावाला स्थायी समिती बैठकीत मंजुरी दिली आहे. या योजनेंतर्गत मोबाईल ॲपद्वारे वाहनधारक घरबसल्या पार्किंगची जागा आणि वेळ आगाऊ आरक्षित करू शकतील. हा प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर राबवला जाणार आहे. वास्तविक पालिकेच्या या प्रस्तावाबाबत सत्ताधारी आणि विरोधी पक्षातर्फे नाराजीचा सूर उमटत होता.या स्मार्ट पार्किंगसाठी सल्लागार नेमल्याने बेकायदा पार्किंग कमी होणार आहे का,ही पार्किंग समस्या नसून मोठे आव्हान आहे, असे मत भाजपाच्या नगरसेविका प्रीती सातम यांनी व्यक्त केले होते.

## ७१ लाख लाडक्या बहिणींना वगळले! शिंदेंचा हल्लाबोल

■ मुंबई

**राष्ट्रवादी** शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी राज्य सरकारवर 'लाडकी बहीण' योजनेवरून हल्लाबोल केला. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतांसाठी तिजोरी उघडून सरसकट पैसे वाटले आणि आता आर्थिक ताण वाढल्यामुळे सुमारे ७१ लाखो महिलांना योजनेतून वगळले जात आहे.

शशिकांत शिंदे म्हणाले की, सुरुवातीला कोणतेही निकष किंवा नियम न पाहता मोठ्या प्रमाणात महिलांना योजनेचा लाभ मिळत होता. मात्र आता राज्याच्या तिजोरीवर आर्थिक बोजा पडू लागल्याने अचानक नियम आणि अटी लागू केल्या.

## लोकसभा खासदारांची संख्या वाढवणार? दक्षिणेच्या राज्यांना फटका! काँग्रेसचा आरोप

■ नवी दिल्ली

**लोकसभा** खासदारांची संख्या पन्नास टक्क्यांनी वाढवण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारच्या विचाराधीन आहे. लोकसभेची सदस्य संख्या सध्याच्या ५४३ वरून ८१६ पर्यंत नेण्याचा प्रस्ताव आहे. सरकारच्या या प्रस्तावाला काँग्रेसने विरोध केला आहे. या निर्णयामुळे उत्तरेतील खासदारांची संख्या वाढून दक्षिण व उत्तर पूर्वेतील राज्यांची गळचेपी होईल असा आरोप काँग्रेसने केला आहे.

लोकसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी केंद्र सरकार लवकरच घटना दुरुस्ती विधेयक आणणार



आहे.त्यासाठी प्रत्येक राज्यातील लोकसभेच्या जागा पन्नास टक्क्यांनी वाढवण्यात येणार आहेत.याचा सर्वाधिक लाभ उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या उत्तरेकडील राज्यांना होणार आहे.तर कमी सदस्य संख्या तुलनेने कमी असलेल्या तामिळनाडू (३९), केरळ (२०) यांसारख्या राज्यांच्या खासदारांची संख्या तुलनेने कमी होऊन त्यांना फटका बसेल. या राज्यांचे देशाच्या राजकारणातील स्थानच धोक्यात येईल,असा काँग्रेसचा आक्षेप आहे. खासदारांची संख्या वाढविण्यामागे केंद्राचा हाच कुटिल हेतू आहे असा काँग्रेसचा आरोप आहे.

## आंतरराष्ट्रीय तणावाचा परिणाम! सोने ५ हजारांनी घसरले

**नवी दिल्ली** - अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावामुळे सोन्या-चांदीच्या दरात घसरण सुरूच आहे. भारतीय सराफा बाजारातील आकडेवारीनुसार आज १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा भाव तब्बल ५,३४६ रुपयांनी घसरून १.४६ लाख रुपयांवर आला आहे. यापूर्वी बुधवारी तो १.५१ लाख रुपये होता. एक किलो चांदीचा भाव १५,१७६ रुपयांनी घसरून २.२५ लाख रुपयांवर आला आहे. २५ मार्च रोजी चांदीचा दर २.४० लाख रुपये होता. गेल्या ३४ दिवसांत सोन्याच्या दरात १३,५९० रुपयांची, तर चांदीच्या दरात ४२,०४० रुपयांची घसरण नोंदवली गेली आहे. यंदाच्या वर्षाच्या सुरुवातीला सोन्याच्या दरात मोठी तेजी दिसून आली होती. ३१ डिसेंबर २०२५ रोजी सोन्याचा भाव १.३३ लाख रुपये होता, तर २९ जानेवारी २०२६ रोजी तो १.७६ लाख रुपयांपर्यंत पोहोचला होता. पण अलीकडील काळात आंतरराष्ट्रीय तणावामुळे दर घसरले आहेत.

## पुणे विद्यापीठात अभाविपचे आंदोलन विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

■ पुणे

**अखिल** भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) कडून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात जोरदार आंदोलन करण्यात आले. काही दिवसांपूर्वी एका विदेशी विद्यार्थिनीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात आले असून, विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर कडक सुरक्षा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आतमध्ये प्रवेश करू नये, यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली होती. अभाविप कार्यकर्त्यांनी आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची अशा घोषणाबाजी करत कुलगुरूंनी स्वतः येऊन निवेदन स्वीकारावे आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षेबाबत ठोस हमी द्यावी, अशी मागणी केली. अभाविप कार्यकर्त्यांनी सांगितले की, यापूर्वीही विद्यार्थिनींनी छेडछाड आणि अश्लील कृत्यांबाबत तक्रारी केल्या होत्या. मात्र विद्यापीठ प्रशासनाने या प्रकरणांकडे दुर्लक्ष केले. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे आणि सुरक्षा व्यवस्थेकडे दुर्लक्ष होत आहे.

## ९६ हजार कोटी देयकांची थकबाकी ७ एप्रिलपासून कंत्राटदारांचे आंदोलन

■ मुंबई

**प्रलंबित** देयकांच्या प्रश्नावरून राज्यातील कंत्राटदार संघटनांनी आक्रमक भूमिका घेत ७ एप्रिलपासून कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनांनी हा निर्णय जाहीर केला. राज्य सरकारकडे विकासकामांच्या देयकांसाठी पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने कंत्राटदारांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. महायुती सरकार स्थापन होऊन १७ महिने उलटूनही केवळ आश्वासनांचा पाऊस पडत असल्याचा आरोप संघटनांनी केला. विविध विभागांतील प्रलंबित देयकांचा मोठा आकडा आहे. जलजीवन मिशन व महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरणाची थकबाकी मागील वर्षी सुमारे ३९ हजार कोटी होती, जी यंदा ३५ हजार कोटींवर आली आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभागाची थकबाकी मागील वर्षी ८५०० कोटी होती, ती यावर्षी ६५०० कोटींवर आली आहे.

## रविवारी सीएसएमटी-मडगाव दोन विशेष रेल्वेगाड्या रद्द

■ मुंबई

**प्रवाशांची** वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने सीएसएमटी-मडगाव दरम्यान २० विशेष फेऱ्या चालवण्याचे नियोजन केले होते. त्यानुसार ५ एप्रिल ते ७ जून या कालावधीत साप्ताहिक विशेष गाड्या धावणार होत्या. मात्र घोषणा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ५ एप्रिल रोजी धावणाऱ्या दोन फेऱ्या रद्द करण्यात आल्या.त्यामुळे प्रवाशांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

गुड फ्रायडेच्या सार्वजनिक सुट्टीसोबत शनिवार-रविवारची साप्ताहिक सुट्टी जोडली गेल्याने अनेक प्रवाशांनी बाहेरगावी जाण्याचे नियोजन केले होते. पण ऐनवेळी गाड्या रद्द झाल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

उन्हाळी सुट्टीमुळे गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वेने एकूण ४६ अतिरिक्त विशेष सेवा चालवण्याची घोषणा केली होती. यात सीएसएमटी-मडगाव दरम्यान २०, तर एलटीटी-संतरागाछी दरम्यान २६ सेवा समाविष्ट होत्या. कोकणमार्गावरील गाड्यांचे आरक्षण १ एप्रिलपासून सुरू झाले.

## गुजरातच्या स्थानिक निवडणुका जाहीर २६ एप्रिलला मतदान! ओबीसी आरक्षणात बदल

■ गांधीनगर

**गुजरात** राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. मतदान पूर्णपणे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांद्वारे होणार असून, २६ एप्रिल रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होईल.

या निवडणुकांमध्ये एक महत्त्वपूर्ण धोरणात्मक बदल म्हणजे इतर मागासवर्गीय म्हणजे ओबीसी आरक्षित जागांसाठी नवीन रोटेशन प्रणाली लागू करण्यात येणार आहे. महत्त्वाच्या निर्णयानुसार, आता सात जिल्हा परिषद अध्यक्ष पदे ओबीसी उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात



आली आहेत. या बदलामुळे स्थानिक नेतृत्वाची रचना बदलण्याची आणि राजकीय प्रतिनिधित्व वाढण्याची शक्यता आहे. राजकीय निरीक्षकांच्या मते, नवीन आरक्षण धोरणामुळे उमेदवारांची निवड आणि मतदार संघटनावर मोठा प्रभाव पडू शकतो. राज्य निवडणूक आयुक्त डॉ. एस. मुरलीकृष्णा यांनी सांगितले की, १५ महानगरपालिका, ८४ नगरपालिका, ३४ जिल्हा परिषद आणि २६० तालुका पंचायत यांच्यासाठी निवडणुका घेतल्या जाणार आहेत. १ एप्रिलपासून निवडणूक प्रक्रिया औपचारिकरित्या सुरू झाली आहे. राज्यात मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणुका घेण्यासाठी आम्ही पूर्णपणे तयार आहोत.

## गिरगाव अक्कलकोट स्वामी समर्थ मठात बुधवारपासून नामस्मरण सप्ताह

■ मुंबई



**शतकोत्तर** १२५ वा रौप्य महोत्सव साजरा केलेल्या गिरगांव मुंबई येथील प्रसिद्ध श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराजांच्या मठात यावर्षी ७७ वा अखंड नामस्मरण, अखंड श्री गुरुचरित्र पारायण व श्री स्वामी कृपामृत पारायण सप्ताहचे आयोजन करण्यात आले आहे. हे पारायण दररोज २४ तास सुरू असणार आहे. बुधवार ८ एप्रिल ते बुधवार १५ एप्रिल या कालावधीत दररोज सकाळी ६ वाजल्यापासून पारायण सुरू असणार आहे. श्रींची पालखी मिरवणूक शनिवार १८ एप्रिल रोजी सायंकाळी ठीक ६ वाजता निघणार आहे. सर्व भक्तगणांनी नामस्मरण, श्रवण व दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन व्यवस्थापन समितीने केले आहे. १० एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता हळदीकुंकू समारंभ संपन्न होणार आहे. बुधवार १५ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता अखंड नामस्मरण सप्ताह व श्री गुरुचरित्र पारायणाची सांगता होईल. त्यानंतर सकाळी ८:३० वाजता आरती, सकाळी १०:०० वाजता लघुरुद्र, दुपारी २:०० वाजता मंत्रजागर, सायं. ४ ते ५:३० वा. किर्तन असे कार्यक्रम असणार आहेत.

## शिंदे व अजित पवार गटाचे २५-३० आमदार भाजपात विलीन होणार

■ मुंबई


### संजय राऊतांचा दावा

**उबाठा** खासदार संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे आणि अजित पवार गटाच्या भवितव्याबाबत राजकीय भाकीत करत राजकारणात खळबळ उडवली. त्यांच्या मते, भविष्यात या दोन्ही पक्षांचे प्रत्येकी २५-३० आमदार प्रमाणावर भाजपामध्ये विलीन होण्याच्या तयारीत असून ते सध्या वेट अँड वॉचच्या भूमिकेत आहेत.

संजय राऊत म्हणाले की,सध्या एकनाथ शिंदे व अजित पवार हे दोन्ही गट स्वतंत्र पक्ष म्हणून काम करत आहे. मात्र त्यांच्या आमदारांमध्ये भाजपात जाण्याची मानसिकता तयार झाली आहे. दोन्ही पक्षातील प्रत्येकी २५ ते ३० आमदार अजित पवार गटाकडून आणि तेवढेच आमदार शिंदे गटाकडून भविष्यात भाजपामध्ये विलीन होतील. याशिवाय सुनेत्रा पवार यांच्या पक्षरचनेवर भाष्य करत ते म्हणाले की, सुनेत्रा पवार यांचा पक्ष स्वतंत्र आहे. सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे पूर्वी अजित पवार यांचे सहकारी होते. मात्र नव्या राजकीय समीकरणात ते सुनेत्रा पवारांसोबत असतीलच असे नाही. दरम्यान ते म्हणाले की,देशातील निवडणूक आयोग चोर आहे. कालच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे परकला प्रभाकरराव यांनी आंध्रमध्ये रात्री ११ नंतर ४-७ सात टक्के म्हणजे १४ लाख मते राज्यत कशी वाढवली त्याचा खुलासा केला.

## आणखी एका भोंदूचा पर्दाफाश महिलांच्या शोषणाचा आरोप

■ पुणे



**पुणे** जिल्ह्यातील खेड तालुक्यातील चांडोली येथील शिवदत्त आश्रमात एका भोंदूबाबाने अध्यात्माच्या नावाखाली महिलांचे शोषण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी नवनाथ गवळी या भोंदूबाबाविरोधात राजगुरुनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अटकेच्या भीतीने आरोपी फरार झाला आहे.

आश्रमात महाराज म्हणून वावरणाऱ्या नवनाथ गवळी याने दोष निवारणच्या नावाखाली महिलांकडून शारीरिक संबंधांची मागणी केली व विनयभंग केल्याचा आरोप पीडित महिलेने केला आहे. सुरुवातीला भीतीपोटी तक्रार करण्यात आली नाही. पण एका महिलेने हिंमत करून राजगुरुनगर पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार केली.

नाशिकमधील अशोक खरात प्रकरणानंतर राज्यभरात अंधश्रद्धेच्या आड लपलेल्या भोंदूबाबांचे प्रकार समोर येत असताना पुण्यातील हा प्रकारही उघड झाल्याने खळबळ उडाली आहे.नागरिकांकडून आरोपीला तातडीने अटक करण्याची मागणी होत आहे.

## निवडणुकीच्या तोंडावर गोकुळच्या ४२७ संस्थांची चौकशी होणार

■ कोल्हापूर

**कोल्हापूर** जिल्हा सहकारी दूध संघ गोकुळच्या कारभाराची चौकशी करण्याचे आदेश पुणे विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाकडून देण्यात आले आहेत. गोकुळच्या निवडणुकीच्या आधी हा निर्णय झाल्याने जिल्ह्यात चर्चेला उधाण आले आहे. गोकुळच्या मतदार यादीतील ४२७ संस्थांच्या नोंदणी व सभासदत्वाची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. मतदार यादीतील एकूण ११०८ संस्थांबाबत वडकशिवाले येथील संचालक प्रकाश बेलवाडे यांनी आक्षेप नोंदवला होता. त्यापैकी ४२७ संस्थांना सभासद करताना नियम डावलल्याचा आरोप त्यांनी केला आहे. ही चौकशी नियमित प्रक्रियेचा भाग असल्याचा दावा गोकुळचे चेअरमन नवीद मुश्रीफ यांनी केला आहे. अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले आहे. गोकुळची पंचवार्षिक निवडणूक काही दिवसांवर आली असून, या निवडणुकीसाठी काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांनी तयारी सुरू केली आहे.